नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

वर्ष २३ अंक : बारावा

एप्रिल
१९६९

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) एप्रिल १९६९ (अंक १२

विदर्भ साहित्य संघ (नागपूर) दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर-१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

३६० विदर्भाचे थोर कवी श्री. गु. ह. देशपांडे
हुड

३६६ काही साहित्यिक टिपणे
शब्दविधी

३६८ एका सन्माननीयाच्या एकाहत्तरी-निमित्त
प्रा. म. श्री. पंडित

३७२ वर्धा सम्मेलनाची फलश्रुती
श्रीकान्त राय

३७५ मराठीचे अध्यापन
डॉ. सुनील सुभेदार

पुस्तक परीक्षण

३७९ दक्खिनी हिंदीचा मराठीवर प्रभाव
श्री. देवीसिंह चौहान.

संघवार्ता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भाचे थोर कवी–

श्री. गु. ह. देशपांडे

श्री. नारायण नागोराव हूड.

प्रत्यगात्मिक वाद

'परडी' सारखी एकादी दुसरी कविता वाचण्यात आली तरी, वाटते येथे काव्याचा खरा विलास आहे. 'कोणता मानू चंद्रमा' या काव्यामुळे श्री. गु. ह. देशपांडे यांचे नाव सर्वपरिचित असले तरी, त्यापेक्षाही उत्कृष्ट अशी 'परडी' वगैरे सारखे काही सौरभशाली फुले त्यांच्या काव्योद्यानात फुललेली आहेत.

'परडी' ही नितांत सुंदर कविता वाचली असता आपण एकाद्या रम्य जगात विहार करीत आहोंत, असा सुखद संभ्रम होतो.

कवी म्हणतात : माझ्या चिरडीला जरीची किनार आहे. (परडी हे सौरम स्थितीतील आत्म्याचे व चिरडी हे क्षुद्र देहाचे प्रतीक आहे.) ज्याप्रमाणे एकाद्या काळ्याकुट्ट मेघाला; चंद्र प्रकाशाची रुपेरी किनार लाभली असता त्याची सौंदर्यप्रतिष्ठा अधिकच वाढते, त्याप्रमाणे माझ्या हीन व्यावहारिक जीवनाला किंवा शरीराच्या चिरडीला स्वयंभू आत्मप्रकाशाच्या जरीची किनार आलेली असल्यामुळे, ते मलीन शरीरही दिव्यत्वांची फुले धारण करण्याकरता योग्य झालेले आहे.

ते माझे शरीर पवित्र व मंगलमय झाल्यामुळे तुम्ही त्याला स्पर्श करू नका. पैलपार (अव्यक्तात) बागबगीचे व फुलांचे मांडव फुललेले आहेत. त्यांच्या कळ्याकळ्यांवर सुगंध नाचतो. त्याचा पराग जमवून मी उधळला. तेथील पुष्पांमधून गुलाबपाणी झिरपते व दळादळावर ते मोत्यासारखे चमकते. त्या फुलांचा मी हार गुंफला आहे. तिथेच अप्सरा–दिव्यांगना गात आहेत.

त्या स्वर्गीय (Divine) सुरांमधून सूर घेऊन माझे गायन चाललेले आहे. म्हणून त्यात दिव्यत्व आहे व त्यामुळे मला तुमचा व्यवहारिक स्वर फार कर्कश वाटतो. तुम्हा ऐहिक किंवा व्यवहारिक लोकांच्या हाती तर्क–कुऱ्हाडी आहेत. शास्त्रांच्या बंधनकारक बेडी आहेत आणि 'दिव्यत्व' तर बंधनातीत व तर्कातीत आहे. ते फक्त अंतःप्रेरणेने (Intuition and inspiration) आकळता येणे शक्य आहे.

गुढगुंजनात कवी निरनिराळ्या प्रतीकांनी बोलत असल्यामुळे, त्यांचा कधी कधी निरनिराळा अर्थ रसिकांनी घेणे शक्य आहे.

श्री. गु. ह. देशपांडे यांची कविता मुख्यतः गुढगुंजनात्मक आहे. म्हणून या लेखामध्ये गुढगुंजनासंबंधी काही नवीन मुद्यांची चर्चा करून, तीस अनुसरून व इतर दृष्टींनीही त्यांच्या काव्याचा विचार करू.

गुढगुंजन म्हणजे काय हे सामान्य वाचकांना तर राहोच, पण कित्येक वेळी चांगल्या पंडितांच्याही लक्षांत येत नाही. उदा० वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांच्यासारखे पट्टीचे विद्वान, केशवसुतांच्या काही गुढगुंजनात्मक काव्याची 'अत्युक्तियुक्त कल्पनेची बडबड !' अशी संभावना करतात !

ईश्वरासंबंधीची प्रतीकात्मक अंतर्मुख कविता म्हणजे गुढगुंजन अशी त्याची व्याख्या करता येईल.

मात्र गुढगुंजनाला अगम्यवाद, रहस्यवाद, शून्य संशोधन, छायावाद, हालावाद इत्यादी पर्याय शब्द आहेत. हे शब्द माझ्यामते बरोबर नाहीत; कारण वाचकांना व रसिकांना जरी ते गूढ असले तरी खुद्द कवीला ते तसे गूढ नसते. म्हणून त्याला 'प्रत्यगात्मिकवाद' व त्यासंबंधी लिहलेल्या गीताला 'प्रत्यगात्मिक गीत' म्हणावे असे मला वाटते.

ईश्वरासंबंधीचे सम्यग्ज्ञान क्वचित अपवाद सोडून मानवास ज्ञान कधीच होत नाही. ज्याला जसा अनुभव,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पना, भावना असेल तेवढ्यापुरताच त्याचा ईश्वर असतो.

ईश्वरी सौंदर्याचा अविष्कार पाहिला म्हणजे—

जस्स जहं ईअ पढमं
तिस्सा अंगाम्भि णिवडिया दिट्ठी
तस्ससहि चेअ ठिआ
सव्वंगं केणविण दिट्ठं।

अर्थ :–(आमच्यापैकी प्रत्येकाची दृष्टी तिच्या अवयवावर प्रथम जिथे पडली, तिथेच तिथेच ती खिळून राहिल्यामुळे तिचे संपूर्ण स्वरूप आमच्यापैकी कोणीच पाहिले नाही).

अशी गाथासप्तशतीत वर्णन केल्याप्रमाणे मानवाची स्थिती झाल्याशिवाय राहत नाही.

मानवाला ईश्वराची अफाट सृष्टी पाहून अत्यंत विस्मय वाटतो. या अनंत सृष्टीमध्ये आपले स्थान किती क्षुद्र व कणवत् आहे यांची जाणीव त्याच्या मनात असते. ही अमर्याद सृष्टी एकदमच निर्माण झाली को, विकासवादाच्या तत्वाप्रमाणे हळूहळू होत गेली ? तिला निर्माण करणारा परमेश्वर कोण व त्यालाही उत्पन्न करणारा अखेरीस कोण ? ईश्वर, सृष्टी व मानव यांचे परस्परसंबंध काय ? इत्यादी कुतूहल–कोडी सोडविण्याकरिता मानवाची हजारो वर्षे धडपड चाललेली आहे. कधी कधी मानवाला 'अहंब्रम्हास्मि' याचेही संवेदन होते. अनंत सूक्ष्म व अनंत विराट अशा या जाणिवांच्या दोन टोकांमधील सर्व अनुभूती, कल्पना, भावना, विचार यांचा समावेश गुढगुंजन काव्यात होत असतो. मधुराभक्ति व सुरभिभक्ति (निराभास) यांचाही विलास आपल्याला त्यात पाहावयास मिळतो.

सौरभ व नाद

सुवास किंवा नाद सूक्ष्मांतून सूक्ष्म अशा अदृष्य स्थानांतून निघून विराट दृष्य क्षेत्रात प्रस्तृत होतो. मानवाला ईश्वराचा साक्षात्कार झाला नाही तरी, त्याच्या अस्तित्वाच्या खुणा सर्व विश्वात दिसू लागतात. त्यामुळे ते मूळ स्वरूप दिसावे, या उत्कट ओढीमधून गुढगुंजनाचा जन्म होत असतो.

वर्डस्वर्थने आपल्या 'Cuckoo' या कवितेत हीच कल्पना प्रकट केलेली आहे. सर्वसामान्य वाचकांना ही कविता कोकिळाला उद्देशून लिहली आहे असे वाटते; पण ही कविता प्रतीकात्मक आहे. तीत कोकिळांचा नाद म्हणजे ईश्वर व कवी म्हणजे जीव अशी कल्पना आहे. तो दिव्य नाद ज्याप्रमाणे ऐकू येतो पण दिसत नाही तशीच ईश्वराच्या बाबतीत निरतिकाची स्थिती होते. आणि

"Thou were a love still
Longed for; never seen" असे उद्गार त्याचे तोंडून बाहेर पडतात.

गुढगुंजनाचा मुख्य विशेष म्हणजे दिव्यत्वाची अदम्य ओढ लागणे. ती व्यक्त करण्याकरता कवी, प्रियकर, प्रेयसी, तम–प्रकाश चाफा–प्रेमिक; राधा–कृष्ण, दिवस–चोर, दुकान–इंद्रजाल, कविता–प्रणयिणी इत्यादी अनेक प्रतीके वापरतो.

गुढगुंजानाची चर्चा करताना अनुभव व कल्पना यांचा जरा विस्तृत ऊहापोह करणे अपरिहार्य आहे. गुढगुंजनाचा आत्माच मुळी अनुभूती असल्यामुळे केवळ कल्पनामय गुढगुंजनाला तादृश्य किंमत नाही.

कल्पनेत अनेक विचारांचे कडबोळे असते तर अनुभवांत एकच विचार सुस्पष्ट असतो. म्हणून कल्पनेतील रचिलेले विविध प्रकारचे विश्व असते. ऐहिक अनुभवातील सर्वांचे सत्य साधारणतः जवळ जवळ एकच असते.

अनुभवाची मर्यादा सोडून कल्पना कोठे लागते व कल्पनेचे क्षेत्र सोडन अनुभव कोठे लागतो ही क्रिया फार सूक्ष्म (subtle) आहे.

अनुभवाच्या बाबतीत संस्कार व निरनिराळ्या व्यक्तींचे संस्कार व विशेषतः ग्राहकशक्ती ही वेगवेगळी असल्यामुळे निर्मितीसत्य एक न दिसता प्रत्येकाच्या त्या त्या शक्तीप्रमाणे निरनिराळे दिसते.

जेवढ्या सामर्थ्याची दूरदर्शिका, ज्यांचे जवळ असेल, त्याप्रमाणे त्याच्या दृष्टीच्या टापूत सत्याचे क्षेत्र जास्त येईल. पर्वताच्या ज्या पातळीवर व्यक्ती असते तेवढेच क्षेत्र तिच्या दृष्टीचा विषय होतो. ती जशी जशी वर जाईल त्याप्रमाणे तिला नवनवीन दृष्ये दिसतात व त्यामुळे तिला पूर्वी आलेले अनुभव बदलत जाऊन त्यांचा कल्पनांत शेवट होतो.

कल्पना ही बदलती असते तर अनुभव हा साधारणतः स्थिर असतो. तो स्थिरच असतो असे नाही. कारण एक ध्येयमुक्त (absolute) ज्ञानापर्यंत सत्य हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ापेक्ष (Relative) आहे. कल्पनेपेक्षा अनुभवाची स्थिरता जास्त काळ टिकणारी असते.

अनुभवाच्या बाबतीत काही निष्कर्ष निघतात—

ज्याची ग्राहकशक्ती दृष्याच्या मानाने तंतोतंत बरोबर (Corresponding or simply convertible) असेल तेथे ती कल्पना नसून अनुभव आहे असे म्हणता येईल.

त्या त्या व्यक्तीचा अनुभव तेव्हाच सारखा होऊ शकतो की, ज्यावेळी प्रत्येकाची ग्रहणशक्ती तिचा व तिचा ग्राह्यविषय सारख्याच प्रमाणाचा असतो.

ग्राहकशक्ती पर्वताच्या जे अंतिम टोकावर आलेले असतात, त्यांचेच अनुभव खरे व शाश्वत असतात.

पण सृष्टीतील प्रत्येक व्यक्तीच्या ग्राहकशक्तीत एवढे सूक्ष्म फरक असतात की, त्यामुळे प्रत्येकाचा अनुभव निरनिराळा होतो, त्यास मर्यादा नाही.

ऐहिक बाबतीत मात्र जे अनुभव येतात, ते मर्यादित असल्यामुळे पुष्कळांचे अनुभव साधारणतः एकसारखे असतात. कारण हे अनुभव बुद्धीतून घेतले जातात व बुद्धी साधारणतः एका तोलाची असू शकते. पण अव्यक्तांचे अनुभव प्रतिमेचे क्षेत्र जितके अकुंठित असते, तितकेच त्यातील अनुभवाचे क्षेत्रही अमिततम असते.

अतिहृषिक प्रत्याहृत्वाद

जगातील सत्य बहुधा सर्वांना एकच दिसते. पण त्या पलीकडील अव्यतिकर सत्य हे प्रत्येकाच्या दृष्टीप्रमाणे वर लिहिले तसे निरनिराळे असते. उदाहरणार्थ एखादी स्त्री फार सुंदर आहे याबद्दल कुणाचेच दुमत नसते. पण हे साधारणतः तिच्या शारीरिक सौंदर्याबद्दल झाले. तिचे आत्मिक सौंदर्य पाहणारी अनेक श्रेणीवरील सौंदर्यदृष्टी एकध्येय मुक्त (Absolute) सौंदर्य सृष्टीपर्यंत वेगवेगळी असू शकते.

वरील विवेचन केल्यानंतर अनुभवाची खरी व्याख्या काय याचा विचार करू.

अनुभव म्हणजे पार्थिव ज्ञानेंद्रियाचा पार्थिव ज्ञेय वस्तूंशी संयोग होणे; किंवा त्यांची एकमेकावर क्रिया–प्रतिक्रिया होऊन ज्ञान होणे होय. (उ. डोळ्यांची रूपावर, श्रोत्रेंद्रियाची शब्दावर, नासिकेची सुवासावर क्रिया होणे) मनाची ग्राहक शक्तिबुद्धी ही आहे. तर आत्म्याची ग्राहकशक्ती प्रतिभा आहे.

हे जसे ऐहिक बाबतीत, तसेच अनैहिक बाबतीत, अमूर्ताच्या ज्ञानेंद्रियाची अमूर्तांच्या ज्ञानवस्तूंवर क्रिया, प्रतिक्रिया होऊन ज्ञान घडणे म्हणजे तो खरा अनुभव होय.

अतिंद्रियज्ञान म्हणजे ज्ञानेंद्रियांच्या पलीकडील किंवा शिवाय, असे जे अमूर्ताचे ज्ञान बहुतेक सर्व तत्वज्ञानात सांगितले आहे ते म्हणणे बरोबर नाही.

अमूर्ताचे ज्ञानही इंद्रिय–विषयकच वा गम्य आहे. मात्र ती ज्ञानेंद्रिये मनबुद्धीची नसून आत्म्याची असतात.

निःसंकेत अवस्थेच्या अंतिम टोकावर आत्म्याला दिव्य चक्षु, दिव्य नासिका इत्यादी येत असतात; व त्यांनी अखिल ब्रह्मांडांतील रूप, रस, नाद, गंध, शब्द याचा उपभोग त्याला एकसमयावच्छेदेकरून याच देहांत घेता येतो. व यालाच मी ब्राम्ही स्थिती म्हणतो. म्हणून याला हृषिकातीत प्रत्याहृतवाद (म्हणजे ज्ञानेंद्रियाच्या पलीकडील किंवा शिवाय) असे न म्हणता अतिहृषिक प्रत्याहृतवाद (Sando-quamoclitlsm) आत्म्याच्या दिव्य, विराट ज्ञानेंद्रियांनी उपभोगला जाणारा अक्षय सूक्ष्म–विराटानंद असे म्हणणे योग्य आहे.

या स्थितीत व्यक्ती स्वयंप्रभ झालेली असते. अखिल विश्वातील ज्ञान तिच्याकडे खेचले जात असते. याला आत्मदीप्त अवस्था (Enlightened State) म्हणतात. येथे व्यक्तीचा प्रहर्ष आश्रितवाद (Hylotheism) किंवा आश्रित–अनाश्रितवाद (Hylozoism) यांच्या पलीकडील विश्वात संचार करीत असतो. या अवस्थेत 'सुरभि' भक्तीचा उदय होऊन व्यक्ती सत्यत्वाने अनंताशी एकरूपता पावत असते. माझ्या अनाघ्रात (Lucere–Deore–Pouvoir–Theory) सिद्धांताचा हा एक प्रमुख पदसिद्धांत असून तो मी नव्यानेच स्वतंत्रपणे 'निराभास' या ग्रंथात प्रतिपादिलेला आहे व नायक निरुपम यांचे मुखातून या स्थितीत द्रष्टा ज्या दिव्योद्भुत प्रकाशमय विश्वात विहार करतो त्याची अनेक दृष्ये मी त्यांत चित्रित केलेली आहेत.

ऐहिक किंवा अतिऐहिक ज्ञानेंद्रियाची, ऐहिक किंवा अतिऐहिक ज्ञेयावर क्रिया–प्रतिक्रिया झाल्याशिवाय मिळालेले सर्व अनुभव म्हणजेच कल्पना होत !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्याचे सर्वच प्रकार जरी आनंदमय असले तरी गुढगुंजन हा प्रकार त्या सर्वात श्रेष्ठ आहे व तो लिहण्यालाही कठीण आहे. मूर्त कल्पना-अनुभूतीपेक्षा, अमूर्त कल्पना-अनुभूती साकार करणे याला विशेष प्रतिभेची गरज असते. गुढगुंजनात निरनिराळी प्रतीके वापरण्यात येत असल्यामुळे रसिकांच्या रसिकतेला त्यात अव्हान असते व ते स्वीकारून त्यात यशस्वी होण्याचा आनंद काही आगळाच असतो.

गुढगुंजन हे काहीअंशी 'द्रौपदी वस्त्रहरणा' सारखे आहे. एक पातळ निघाल्याबरोबर दुसरे त्याहीपेक्षा रंगदार व आकर्षक असावे, त्याप्रमाणे खऱ्या गुढगुंजनात एक एक नवनवीन आवरणाचे दर्शन होत जाते. सार्वभौम सत्तेसंबंधीचे हे अमूर्त काव्य असल्यामुळे, त्यांत उदात्तता, भव्यता, रोमांचकारिकता इत्यादीस फार वाव असतो. गुढगुंजन म्हणजे खराखुरा सौंदर्यवाद होय.

श्रेष्ठ कवीला नुसते भास (Visioner or Glimpses) दिसतात. द्रष्टया कवीला अनियत सत्यच (Obsolute truth) दिसते.

गुढगुंजनाची असंख्य काव्ये कवी लोक केवळ प्रथा म्हणून करतात. काहीत पूर्वीच्या साहित्यातील विचार अभ्यासून आलेले असतात. अनेक कविता तर वाचकांवर छाप पडण्याकरता, तत्वज्ञानांची परिभाषा वापरून गुढगुंजनाचा केवळ आभास निर्माण करण्याकरता अस्तित्वात येतात. कित्येक वेळा अव्यक्त विचार व्यक्त करताना कवीची भाषा फारच तोकडी पडते. त्यामुळे त्यांपैकी वरीच काव्ये दुर्बोध व निरर्थकही होतात.

गुढगुंजनात ईश्वरविषयक क्षणिक उर्मीच्या कविता बऱ्याच असतात. पण चिरकालिक वृत्तीतून लिहिलेल्या असतील त्यांनाच महत्व. उत्कृष्ट गुढगुंजन लिहण्याकरता एक प्रकारची प्रत्यक् दशा यावी लागते. गूढगुंजनांत सगळी कविता आत्मलक्ष्मी असते. काही पाश्चात्य टीकाकारांनी (उ. मिसेस अंडरहिल वगैरेंनी) गुढगुंजनाची मीमांसा खालीलप्रमाणे केलेली आहे—

कवीला एक प्रकारचा दिव्य प्रकाश दिसतो. तो नाहीसा झाला, म्हणजे त्यावद्दलची हळहळ मनास वाटून, त्यातून त्याची काव्ये निर्माण होतात पण हे बरोबर नाही. जोपर्यंत तो प्रकाश त्याच्या दृष्टीसमोर असतो तोपर्यंतच तो उत्कृष्ट काव्ये लिहू शकतो. प्रकाश गेल्यानंतर त्याची प्रतिभा मंद होते कारण प्रतिभा म्हणजेच एक प्रकारचा दिव्य प्रकाशच आहे.

श्री. देशपांडे यांच्यासारख्या दार्शनिक कवीच्या काव्याचे कोणत्या दृष्टिकोनातून रसग्रहण करणे इष्ट आहे, हे समजण्याकरता वरील दिग्दर्शन सहाय्यभूत होईल अशी आशा आहे.

अष्टदिशा स्तंभावरी

१९२१ सालची गोष्ट. वडोद्याला महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते तात्यासाहेब केळकर अध्यक्ष होते. त्या संमेलनातील काव्यगायनाच्या कार्यक्रमात श्री. गु. ह. देशपांडे यांनी आपली 'कोणता मानू चंद्रमा' ही कविता इतक्या सुंदर घाटणींत म्हटली की, श्रोतृवृंद मंत्रमुग्ध झाला.

कविता संपल्यानंतर डॉ. माधवराव पटवर्धन एकदम त्यांच्याकडे आले व त्यांनी गु. ह. चे सहर्ष स्वागत करीत म्हटले, 'गुणवंतराव, आज तुम्ही आमच्या पुणेकर कवीला सपशेल जिकले !'

डॉ. माधवरावसारख्या पंडित कवीने त्यांची जी स्तुती केली, त्यावरून त्यांच्या उच्च प्रतिभेची साधारण माणसालाही कल्पना येण्यासारखी आहे.

जळगाव येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनात त्यांना त्यांच्या काव्यनैपुण्यावद्दल संपूर्ण पदक बक्षिस मिळाले. त्यांच्या कविता, निवेदन, विदर्भवीणा, महाराष्ट्र शारदा, काव्यकौमुदी इत्यादि ग्रथांत व रत्नाकर, मनोरंजन, सुषमा, अभिरुची, विहंगम, काव्यरत्नावली इत्यादी व दुसऱ्याही अनेक नियतकालिकांत प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षापासून काव्यें लिहण्यास सुरुवात केली. त्यांच्या घराण्यांतील वातावरण धार्मिक होते. पुराण, कीर्तन, श्रवणाची त्यांना आवड लागली व वृद्धांची वेदांतचर्चा लहानपणापासूनच कानांवर पडत असल्यामुळे त्यांच्या मनावर आस्तिकतेचे व तत्वचिंतनाचे सस्कार झाले.

अगदी लहानपणी ते ११–१२ वर्षांचे असताना जेव्हा सुटीत स्वतःच्या गावी येत, त्यावेळी जुन्या मराठी काव्याचा व्यासंग असलेले त्यांचे चुलत चुलते त्यांच्याकडून मोरोपंताचे आर्या भारत व इतर प्राचीन कवींची काव्ये वाचून घेत व त्यातील अर्थालंकार वगैरे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समजावून सांगत. त्यामुळे तेव्हापासून त्यांना काव्याची गोडी लागली. त्यावेळीच त्यांनी श्रीमत् भगवत्गीता व रामगीता पाठ करणे सुरू केले होते. पुढे शाळेत संस्कृत व मराठी हे भाषाविषय घेतले होते. शाळेच्या नंतरच्या आयुष्यात त्यांनी संस्कृत काव्याचे वाचन केले. या सर्व जुन्या परंपरेचा त्यांच्या काव्यात परिपाक झाला असल्यास नवल काय ?

नागपूरला हायस्कूलमध्ये असताना सन १९१८–१९ च्या सुमारास 'रिस्ले सरक्युलर' विरोधी चळवळ त्यांनी केली व त्या चळवळीतील विद्यार्थ्यांचे पुढारीपण त्यांचेकडे आले.

एखाद्या सुवर्ण करंडकात निवडक अमोल रत्नें भरून ठेवलेली असावी त्याप्रमाणे त्यांच्या काव्याचे स्वरूप आहे. त्यांच्या कविता समजण्याकरता रसिकांची बऱ्याच वरच्या दर्जाची पातळी असावी लागते. मराठी काव्य वाङ्मयात ज्यांनी अगदी कमीत कमी कविता लिहून जास्तीत जास्त मानाचे स्थान मिळविले आहे, अशा 'बी' सारख्या कविवर्यांच्या श्रेणीत श्री. देशपांडे यांना स्थान द्यावे लागेल.

त्यांच्या निवेदनमध्ये आलेल्या बहुतेक सर्वच कवितांची पातळी उच्च दर्जाची आहे. तरी त्यातल्या त्यात "वाऱ्याचे भारे' ही त्यांची कविता कल्पना व अनुभूती या दृष्टींनी सर्वात उत्कृष्ट आहे. या कवितेत शाश्वत–अशाश्वततेचे तत्व चित्रित केले आहे. अशाश्वततेच्या मागे लागणे म्हणजे वाऱ्याचे भारे बांधू जाण्याइतके वेडेपणाचे आहे, हे दाखविले आहे.

'अष्ट दिशा स्तंभावरी ।
अवकाशाची इमारत ।
निरालंब राहे उभी ।
निराकार भवतां भित' ।

अशासारख्या ओळींतील भव्यता कोणास स्तिमित करणार नाही ? 'नवल' या कवितेतील—

'नवल काय जाहले ।
दीप गगनि लागले' ।।

या धृपदातील ओळीत व पुढेही सृष्टी निर्माणकर्त्याच्या अगाध कृतीबद्दल रोमांचकारी विस्मयजनक भावना रेखाटली आहे. आकाशात नक्षत्रे एकदम् दिसल्याबरोबरच या ओळी मुखातून तात्काळ उस्फूर्त झाल्याचा भास होतो. 'तान्हे बाळ' या कवितेतील राजा म्हणजे विश्वाचा निर्माता. राणी म्हणजे त्याची निर्माणशक्ती व तान्हे बाळ म्हणजे निर्मिती होय.

'काळरजनी' या कवितेतील

भरला भयाण सागर ।
पसरली रात्र घोर ।
कशी जाऊ पैल पार ।

इत्यादी ओळींत ईश्वरांच्या मीलनाच्या आर्ततेबरोबरच त्या मार्गात येणाऱ्या अडथळ्याचा उल्लेख उत्कटतेने व्यक्त झालेला आहे. भयाण सागर व घोर रात्र ही अडथळ्यांची प्रतीके आहेत. 'हुरहूर' या कवितेत कवीला न दिसणारा नाद ऐकू येतो. वर्डस्वर्थच्या वर उल्लेखिलेल्या कवितेत, वर्डस्वर्थला नादाचा नाद लागलेला आहे. या कवितेंत कवीला नाद तर हवाच असतो पण तो मिळाला नाही तरी 'न कळे ये कुठूनी–न दिसो गाणार नयनी–येवो चिरगान श्रवणी–हीच आंस हृदी–लागलेली आहे. म्हणजे येथे भक्ती हे साधन नसून साध्य आहे असे व्यंजकतेने दाखविले आहे.

'प्रतीक्षेंत' 'साऱ्या अवकाशामध्ये उजळल्या ज्योति ज्योति । तुझी पहावया मूर्ति ही घटना घडून येऊन 'पराईतीं'त 'एक देखणे नयनी । एक बोल दो वदनी' अशी कवीची अद्वैताची स्थिती झाली आहे.

'कोणता मानु चंद्रमा' या कवितेतील कल्पना प्रसन्नता निर्माण करण्यासारख्या आहे.

'निवेदन' या कवितेत कवीला सर्वाठायी ईश्वराचा भास होऊन त्याच्या कल्पनेचा निरास झालेला आहे.

बालकावर त्यांनी थोड्याशाच कविता लिहिल्या आहेत. त्यांत दुकान, इंद्रजाल इत्यादी मोह–मायासंबंधी प्रतिके घेतलेली आहेत. (चल फिर माघारी या कवीतेत.) 'तान्हुले' या कवितेत बालक म्हणजे साकारलेले चैतन्य असे म्हटले आहे.

निवेदनमधील 'प्रेमळ द्वैत', 'श्याम', 'मुरली', 'विनवणी' ही गीते राधाकृष्णावर लिहलेली आहेत ती चांगली असली तरी पूर्वीपासून या विषयावर इतरत्र फार गीतें लिहिण्यात आल्यामुळे ती विशेष नावीन्यपूर्ण वाटत नाहीत. मधुरा भक्तीची काही उत्कृष्ट गीते त्यांनी लिहिलेली आहेत. त्यांतील काही ओळीतील उत्कटता जाणवण्यासारखी आहे.

उजळास उजाळा !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वाऱ्याचे भारे', 'तान्हे बाळ', 'नवल', 'कोणता मानु चंद्रमा', ? 'मेघगर्जना' इत्यादी कविता उघड उघड बहुश: कल्पनेच्या असल्या तरी 'प्रतीक्षा', 'पराप्रीति, 'निवेदन', 'जाणार कशी तूं ?' 'संध्याकाळ', 'जिव्हाळा', 'निश्वास', 'जलीच विरे जलतरंग', 'परडी 'लागला दिव्याने दिवा' इत्यादीमध्ये त्यांचे काहीसे स्वतंत्र अनुभव अस्फुटतेने दिसून आल्याशिवाय राहात नाहीत. त्यावरून अव्यतिकर सत्याचा अंश पाहण्याचा दृष्टिकोन त्यांचे वाक्यात पहावयास सापडतो. त्यातील थोड्याशा अनुभूति वरच्या पातळीवरून व्यक्त झालेल्या आहेत ईश्वराच्या अस्तित्वाच्या खुणा त्यांच्या वाक्यग्रंथांत विखुरलेल्या दिसतात.

या कवितांमध्ये त्यांची संविक्त अनुभूति उत्तरोत्तर सघन होत गेलेली दिसते व त्या कविता, कवी एका विशिष्ट प्रत्यकदर्शत आहे, हे दर्शवितात, कारण काही थोड्या ठिकाणी कवीची ग्राहकशक्ती ग्राह्याच्या साधारणत: बरोबरीची दिसून येते.

त्यांच्या गुढगुंजनांत काही ठिकाणी भव्यता व उदात्तता आलेली आहे. काही कविता चिरकालिक उर्मीमधून जन्म पावलेल्या आहेत. त्यांच्या काव्यात सर्वत्रच गुढगुंजन नाही. बऱ्याच कविता केवळ ध्वनियुक्त आहेत.

त्यांची 'गोंधळ' ही कविता राष्ट्रविषयक असून तिचे कोलंबिया रेकॉर्ड घेतलेले आहे. ती कविता रचनेच्या दृष्टीने चांगली असली, तरी तींत स्वातंत्र्यगीतातील कणखरपणा असावा तितका दिसून येत नाही. शिवाय मधेच कृष्ण गोपिका आणल्यामुळे खटकल्यासारखे वाटते.

'चंद्रावरील कलंक' या कवीतेतील काही कल्पना ओढून ताणून आणलेल्या वाटतात व काही कविता वाजवीपेक्षा जास्त दीर्घ झालेल्या आहेत.

'निवेदन' काव्य संग्रहात सर्वत्र प्रसन्नतेचे वातावरण खेळते आहे. पण 'सकाळचा चंद्र' या भावनेचे त्यास जरा गालबोट लागले आहे असे वाटते.

एकंदरीत कल्पनामय व अनुभूतिपूर्ण अशी दोन्ही प्रकारची त्यांची काही वरील गीते मराठी भाषेतील अनर्घ्य रत्ने आहेत यांत शंका नाही.

कमळामधील रूप, रस, गंध, सुकुमारता, कीर्ती यांचा कीस काढून त्याचा साकल्याने आनंद घेता येत नाही, काव्याचेही तसेच आहे. गुणवंतरावाच्या काव्यात जे गुण आहेत, त्यांचा रसिकांनीच स्वाद घेऊन त्याचे मूल्यमापन करणे इष्ट होईल.

त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यानंतर त्यांच्या काव्याचे निराळे पैलू दृष्टीस पडतील, यात मला शंका वाटत नाही.

त्यांच्या एका अलीकडे लिहिलेल्या 'लागला दिव्याने दिवा' या कवीतेत

काजळी न वा स्नेह ते
हे असेच की तेवते
उजळास उजाळा इथे
धरिता न आतुडे तरी
आकार घे न वैखरी
हे असेच काही तरी

असे उद्गार दिसून येतात.

त्यांच्या या अवस्थेवरून त्यांना त्या ब्रम्हानंदाचा महासागर आतुडला नसला तरी त्याची एकादी उर्मी तरी खासच लाभलेली आहे. 'लोहितिनी'चा एकादाच कण सारा जलाशय रक्तिम-राग-रंजित करतो; त्याप्रमाणे वर उल्लेखिलेली एकच उर्मी सुद्धा कोणाही मानवाचे जीवन संपूर्ण उजळून काढण्यास समर्थ असते.

श्री. देशपांडे यांच्या ७१ व्या वाढदिवशी युगवाणीचे संपादक व चालक त्यांचे जीवन व काव्य यासंबंधी युगवाणीत लेख प्रकाशित करून त्यांचा सन्मान करीत आहेत, याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. मीही व्यक्तिश: त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो.

—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काही ' साहित्यिक ' टिपणे

★

— शब्दवेधी

आमचे स्नेही 'शब्दवेधी' यांच्या अप्रसिद्ध लिखाणातून आम्ही काही 'साहित्यिक' टिपणे प्रसिद्धीसाठी निवडलेली आहेत. ती क्रमशः 'युगवाणी'तून प्रसिद्ध होतील. या टिपणात व्यक्त झालेली मते 'शब्दवेधी'ची आहेत. त्यांचा संपादकांवर कोणीही आरोप करू नये— संपादक 'युगवाणी')

अण्णाजी बोबडे

अण्णाजी बोबडे यांची कविता मी फार उशिरा वाचली. माझ्या लहानपणी 'रविकिरण मंडळा'तील कवींची प्रसिद्धी फार होत होती. त्यामुळे मी यशवंत, माधव ज्यूलियन, गिरीश यांची कविता वाचली होती. नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रातून सुद्धा यशवंताचीच प्रसिद्धी जास्त होत होती. बोबड्यांच्या कवितेचा उल्लेख फारच क्वचित होत असे. शाळेत व महाविद्यालयात मी मराठी विषय घेतला नसल्यामुळे माझे मराठी वाङ्मयाचे वाचन अपुरे, अधुरे होते. अण्णाजींचे नाव कानावरून गेले होते. परंतु त्यांची कविता उपलब्ध झाली नव्हती. त्यावेळेस 'महाराष्ट्रा'ने स्थानिक साहित्यकारांना अनुल्लेखाने मारण्याचे ठरविले होते असे वाटते. पुण्या मुंबईकडील कमअस्सल कवींची अप्रशस्त प्रशस्ती आणि स्थानिक साहित्यिकांचा अनुदार अनुल्लेख हे त्यावेळचे 'महाराष्ट्रा'च्या साहित्यिक पुरवणीचे धोरण होते. त्यामुळे 'महाराष्ट्रा'त सुद्धा अण्णाजींचा उल्लेख फारच क्वचित् होत असे. त्यावेळेस आमच्या ज्येष्ठ स्नेह्यांच्या तोंडून आम्ही अण्णाजींच्या 'शृंगार-संगीता'ची स्तुती ऐकत असू पण ते काव्य आम्हाला उपलब्ध झाले नव्हते. आम्ही त्या काळात माधव-ज्यूलियनचे भक्त बनलो होतो. 'माझे स्नेही नी. र. वऱ्हाडपांडे ह्यांना 'विरहतरंग' मुखोद्गत होते. सावरकरांची कविता आणि बालकवींची कविता आम्हाला फार आवडत असे. महाविद्यालयात मी सामाजिकशास्त्रे पदवी परीक्षेसाठी निवडली असल्यामुळे माझे मराठी वाङ्मयाचे वाचन फारच कमी झाले होते. एका कवि—संमेलनात राजा बढे यांच्या तोंडून 'हरवले माझे पिंपळ पान' आणि, अरे ! आला कवी !' ही विनोदी कविता ऐकली होती परंतु अण्णाजींच्या कवितांचे पुस्तक मला मिळाले नव्हते. एकदा दुपारी गर्गे यांच्या 'वीणा प्रकाशना'च्या महाजन चाळीतील कार्यालयात बसलो असताना अण्णाजींच्या समग्र कवितांचे पुस्तक हाती लागले. ते मी विकत घेतले आणि एका रात्रीत संपूर्ण कविता वाचून काढली. मला त्या कवितांनी वेड लावले. तात्याजी वझलवार यांनी ते प्रसिद्ध केले होते. या कवितांची चांगली आवृत्ती निघावयास पाहिजे. (बोबड्यांच्या समग्र काव्याची द्वितीयावृत्ती प्रसिद्ध होणार आहे असे ऐकतो— संपादक) सावरकर, गोविंद, तांबे, चंद्रशेखर, बालकवी यांच्या कवितेप्रमाणेच अण्णाजींच्या काव्याने मोहिनी टाकली. कित्येक दिवस मी त्या कविता गुणगुणत असे. 'जाग जाग जाग सखे ! उजळल्या दिशा' ही कविता विश्राम बेडेकरांनी एका चित्रपटात वापरली असल्यामुळे फारच लोकप्रिय झाली होती. तसेच हरिभाऊ मोटोंनी 'प्रतिभे'त 'परिचय' कवितेचे दोन्ही भाग प्रसिद्ध केले होते त्यामुळे ती कवितासुद्धा बरीच लोकप्रिय झाली होती. अण्णाजींना पाहण्याचे भाग्य मला लाभले नव्हते. परंतु माझे ज्येष्ठ स्नेही श्री. रामाजी काळी यांच्याकडून त्यांच्याबद्दल बरीच माहिती मला मिळाली. अण्णाजी बोबडे हे एक राजयोगी गृहस्थ होते. त्यांचे सौंदर्योपासक मन काव्य-कलेकडे वळले ते जीवन सौंदर्यमय करण्याचे साधन म्हणून. त्यांची काव्याविषयाची कल्पना संस्कृत साहित्य शास्त्रांवर आधारलेली होती. त्यांच्या अभिजात रसिकतेला सावरकरांचे काव्य रुचले. 'कमला' काव्याचे कौतुक करणारी कविता त्यांनी लिहिलेली आहे.

> **कसे कविवरा ! फेडू प्रेमाचे हे तुझे ऋण ?**
> **आवडो भक्ति-भावाचे ज्याचे त्याला निवेदन'**

असा त्या कवितेचा शेवट आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अण्णाजी हे नागपूरकरांचे अतिशय प्रिय कवी होते. नागपूरकर काव्यरसिक संस्कृत काव्याच्या परंपरेत मुरलेले होते. त्यांना अण्णाजींची विदग्ध काव्यरचना पसंत पडल्यास नवल ते काय ? त्यांच्या 'शृंगार संगीता'ने निर्मळ वैषयिक काव्याचा आदर्श निर्माण केला. 'शृंगार संगीता'तील अनेक श्लोक माझ्या जिभेवर नाचू लागले. आवडलेली कविता कंठस्थ करावयाची अशी माझी त्या काळातील एक सवय होती अण्णाजींची कविता नादमधुर आहे व म्हणूनच ती रसिकांना वेड लावू शकली.

वृंदावनी तुज भेटेल माधव
नीट सरळ जा या वाटेने
दिसतील तुज हरिचरण उमटले
यमुनेच्या काठाकाठाने

'राधा–माधव' या सुंदर कवितेचा हा प्रारंभ आहे. त्यांचे प्रसादयुक्त प्रसन्न काव्य रसिकांना प्रिय झाले याचे कारण त्यांची शब्दकला. मोहक, नाजुक, अर्थगंभीर अशा शब्दकलेने त्यांची प्रत्येक कविता अलंकृत झालेली आहे. 'परिचय' ही कविता मला सहज कंठस्थ करता आली.

परिचय झाला नव्हता तेव्हा
नव्हती ही जाचणी जिवाला
मी नव्हतो तुज सजन सखे !
तू नव्हतिस मज साजणी
नव्हती गुंतागुंत मनांची
नव्हता हा आठव परस्पर
नव्हते नयनी पाणी नव्हता हृदयावर घाव

असा या कवितेचा प्रारंभ होता. या कवितेच्या दुसऱ्या भागाचा प्रारंभ असा आहे.

तू नव्हता मज सजन सख्या!
मी नव्हती तुज साजणी
नव्हती पडली गाठ रेशमी,
नव्हती आलिंगने कोवळी

अण्णाजींनी लिहिलेल्या लावण्या, फ़ारच उत्कृष्ठ आहेत. सध्या 'लोकनाट्याला' उधाण भरती आली आहे. ओंगळ, अश्लील लावण्यांपेक्षा अण्णाजींच्या लावण्या गायिल्या गेल्या तर केवढी बहार होईल. मला कधी कधी असे वाटते की ग. दि. माडळगुकरांनी या लावण्यांचा चित्रपटात जर उपयोग केला तर त्यांना अधिक प्रसिद्धी मिळेल आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्या गायिल्या जातील. तमाशांच्या प्रवर्तकांनी अण्णाजींच्या काव्याचा उपयोग करण्यास काहीच हरकत नाही.

'कोमल बाला मन्मथ पुतळी जवळ असावी सदा
नारी तरुणांची संपदा'

किंवा

'नको ग मारूस मुरके वरिवरी तुझे
नैन फिरवी इकडे'

किंवा

'आज पौर्णिमा मुखचंद्राची, माझ्यावर चांदणे'

अथवा

'पिवळी कवळी कळी चाफ्याची राजस
अवयव वय चवदा'

उघड्या बाजारात बसली नगदा नगदीचा सवदा'

या लावण्या लिहिणारा कवी एक पुरुषार्थी गृहस्थ. अण्णाजींचे व्यक्तित्व फारच मोहक होते. अण्णा पक्के नागपुरी होते. अण्णाजी नुसते कवी असते तर नागपूरकरांना फारसे आवडले नसते. कुस्त्यांच्या दंगलीत रस घेणारे, मोकळ्या मनाने विलास करणारे, काव्यशास्त्रापासून ते खगोलविद्येपर्यंत अनेक विषयांचा अभ्यास करणारे एक गुणसंपन्न व्यक्ती म्हणून नागपूरकरांना ते आवडत असत. राजकीय विचारांबाबत मतभेद असलेले अनेक लोक अण्णाजींकडे आकृष्ट होत याचे कारण त्यांचे निर्मळ प्रसन्न व्यक्तिमत्व.

'फुले कुणाला वहायची तर पुढे समाधीवर वहा !
झरझर पाऊल टाकित येतो तियेच

त्याची वाट पहा ॥

असे आपल्या रसिक मित्रांना सांगून अण्णाजी 'चिरंतनात विरले'.

(क्रमशः)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका सन्माननीयाच्या एकाहत्तरी— निमित्त

★

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

अंदाजें चव्वेचाळीस वर्षे झालीं असावी, एके दिवशीं सायंकाळीं मॉरिस कॉलेजच्या दिवाणखान्यात शारदा मंडळाच्या वतीने गुणवंत हनुमंत देशपांडे यांच्या काव्य-गायनाचा कार्यक्रम होता. हॉल श्रोत्यांनीं खच्चून भरला होता. पण गडवड-गोंगाटाचे नावनिशाण नव्हते. एखादी सुई पडली तरी तिचा आवाज स्पष्ट ऐकू यावा इतकी श्रोत्यांची शांतता व स्तब्धता होती. ते गुणवंत-रावांच्या कविता ऐकण्यास आतुर झाले होते. मला आठवते, अध्यक्षाची खुर्ची मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब मिराशी यांनी भूषविली होती. आता काव्यगायनाला आरंभ झाला होता. गुणवंतराव एक कविता संपल्यावर दुसरी कविता म्हणत होते. श्रोते त्यांना अनुकूल दाद देत होते. काही श्रोते मधूनच 'कोणता मानू चंद्रमा ? ही कविता म्हणण्याचा आग्रह करीत होते. परंतु चाणाक्ष गुणवंतरावांनीं तो हुकुमी एक्का हातात राखून ठेवला होता. आता ते 'नवल' हे गीत गात होते. गीताचा मुखडा, कुणाही रसिकाचे काळीज ओढून नेईल, असा वेधक होता. एक कडवे संपून पालुपद येताच गुणवंतराव तो पुन्हा पुन्हा निरनिराळ्या हरकती व मुरके घेऊन आळवीत होते..

नवल काय जाहलें !
दीप गगनि लागले !

कशामुळें ?
कुणाकळे ?

तिमिर सभय तो पळे !
दीप गगनि लागले

हे गीत आळवताना जेव्हा ते पुढील ओळींतील अप-न्हुतीवर आले;

यान तारका नभांत
सुरवरांगनाच गमत
गजगती,
विचरती,
हांसुनीहि लाजती
किंवा, लपविती क्षणीं मुखास,
करितां त्या क्षणीं विलास,
वसुमति—
वरि, किती
सानुराग उतरती !

तेव्हा गीतांतील कमनीय कल्पना विलासाने, रमणीय अलंकारांच्या प्रकाशाने आणि गीताच्या गतींतील डौल-दार पदविन्यासाने रसिक मुहूर्तमात्र कवीची सुरेलवाणी ऐकत जागच्या जागीं खिळून राहिले. आणि कार्यक्रम आता संपणार म्हणून जो दारांतून डोकावून हॉलच्या बाहेर आकाशाकडे पाहू लागले, 'तो गजवती, विचरती, हांसुनीहि लाजती' हा कविकल्पनेंतला चमत्कार त्यांना प्रत्यक्ष दिसला.

गुणवंतरावांच्या कविता 'निवेदन' या त्यांच्या कविता संग्रहात संगृहित करण्यात आल्या आहेत. परंतु त्या डोळ्यांनी वाचण्यात मौज नाही. त्यांचा खरा आनंद त्या 'कविच्या मुखें' किंवा गोड गळ्याच्या कुणातरी काव्यलोलुपाच्या मुखाने ऐकण्यात आहे. शब्दांना नाद असतो. त्यात छुपे संगीत असते, आणि शब्दांना अर्थ असतो, त्यात पछाडणारी जादू असते गुणवंतरावांची 'गुणवंती' या गुणांना बरोबर घेऊन जन्माला आली आहे. तें गुण तिला चिकटवलेले नाहींत. ते तिचे अंगभूत गुण आहेत. तिच्यावर 'वृत्तशैथिल्य आणि क्वचित् कल्पनांचा गोंधळ' हे दोष लादण्यात आले आहेत, *परंतु 'व्यंजनाला स्वतंत्र उच्चार नसतो. म्हणून त्याची

---

* अर्वाचीन मराठी काव्य. आवृत्ति पहिली पृ. २५६ आणि आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास. पृ ४४१ खंड २ रा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मात्रा मानीत नाहीत आणि गणना उच्चारकालाची करतात, अक्षरांच्या रूपांची करीत नाहीत' हे दोन महत्वाचे छंदी नियम लक्षात घेतले म्हणजे ते दोष व्यर्थ ठरतात. उमरावती येथील सुप्रसिद्ध गायनाचार्य कै. नामदेवबुवा यांच्या गायनशाळेतील काही विद्यार्थी तेथील हिंदू हायस्कूलमध्यें गुणवंतरावांचे सहाध्यायी होते. त्यांच्या सहवासामुळे गुणवंतरावांना गायनाची चालचलाऊ माहिती आहे हे या संदर्भात लक्षात घेणे आवश्यक आहे.

इतर कवींप्रमाणे गुणवंतरावांनाही कवितेची गोडी अगदी लहान वयात त्यांचे चुलत चुलते अंबादास काशीनाथ उर्फ बापूसाहेब देशपांडे यांच्या सहवासामुळे व मार्गदर्शनामुळें लागली. पुढें हिंदू हायस्कुलात त्यांच्या काव्यलेखनाला त्यांचे गुरू सुप्रसिद्ध कादबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी यांचे उत्तेजन मिळाले. गुणवंतरावांच्या प्रतिभेवरले हे लहान वयातले संस्कार लक्षात घेतले म्हणजे त्यांची कविता गेय का ? तिचे वळण जुने मराठी का ? आणि ती सरस व सालंकृत का ? या प्रश्नांचा आपोआप उलगडा होईल.

गुणवंतरावांच्या कवितेवर त्यांच्या विद्याव्यासंगाचाही प्रभाव पडला आहे. मुक्तेश्वर, रघुनाथ, वामन व मोरोपंत हे पंडित कवी त्यांच्या विशेष आदराचे आहेत. तत्त्वविवेचक ज्ञानेश्वर आणि प्रेमळ भक्त तुकाराम महाराज यांची वाणी ऐकल्याशिवाय त्यांचा एकही दिवस जात नाही. अर्थात् त्यांच्या कवितेचा बराच भाग गूढ तात्त्विक कवितांनी व्यापलेला असावा हे स्वाभाविक आहे. गुणवतरावांच्या कवितेत अगदी 'प्रारंभापासून थोडीफार गूढता आहे. परंतु वयोमानाने ती वाढत्या श्रेणीने वाढत गेली आहे. 'कशामुळें ? ना कळे! दीपगगनि लागले' या, किंवा, 'मेघ गर्जेना! पाणी बरसेना ! रान कैसें हिरवें राही ! कांहीं कळेना ! ' या त्यांच्या ओळीत परेच्या तत्त्वाचा ओझरता स्पर्श आहे आणि तो अतिशय सूक्ष्म व सूचक असल्यामुळे 'नवल' आणि 'कांहीं कळेना' ही त्यांची दोन्ही गीते आदर्श ध्वनि काव्याचे नने म्हणून रसिकांसमोर ठेवता येतील. परंतु पुढें पुढें गुणवंतरावांना ध्वनीपेक्षा गूढतेचं विशेष आकर्षण वाटू लागले. त्यामुळे त्यांची प्रतिमा 'तान्हेंवाळ', 'वाऱ्याचे भारे', 'प्रतीक्षा' इत्यादी गहन गूढ कविता प्रसवू लागली. वस्तुतः काव्य आणि तत्त्वज्ञान यांची घरे समाईक भिंतीची असली, तरी ती वेगवेगळी आहेत. काव्याच्या गृहात समाईक भिंतीची जी बाजू त्याच्याकडे आहे, तिला महत्व आहे. तत्त्वज्ञानाच्या गृहात विरुद्ध बाजूचे महत्त्व आहे. या दोन्हीची सरमिसळ झाल्यास धड काव्य नाही की धड तत्त्वज्ञान नाही अशी परिस्थिती उपस्थित होण्याची वास्ती असते.

गुणवंतरावांच्या शृंगारिक कविता त्यांच्या युगातील पद्धतीप्रमाणे राधा कृष्णाच्या प्रेमसंवादांवर आधारलेल्या आहेत. त्यात शारीरिक प्रीती, मानसिक भक्ती आणि शरीर व मन यांच्या पलीकडील मूर्ती यांचा त्रिवेणी संगम साधण्याचा प्रयत्न आहे. राधाकृष्णांच्या या प्रेमपर गीतांवर अधूनमधून कवीकल्पनेच्या गुलाबपाण्याचा सुगंधित शिडकाव आहे. 'फाग'मध्ये राधाकृष्ण रंगपंचमीचा रंग उधळत रंग खेळत आहेत. त्या रंगांत रंग मिसळताना एक गोपांगना कल्पना करते कीं :--

> तिमिराचा काळा काळा
> जमवूनी रंग सगळा
> पिचकारी रविवरि मारू गे
> प्रीतिनें फाग खेळूं ग

वाऱ्यावर त्या या स्वप्नाळू कल्पनेपेक्षा 'विनवणी' मधील कायिक शृंगार काही रसिकांना वास्तव म्हणून विशेष रुचेल :--

> असाचि जरि वाटतो । रहावा
> गळचा मंवतिचा पाश करांचा
> सोड सोड सत्वरीं । झडकरी ॥ सोड सख्या ॥
> तुटलो आलिंगनीं । अडकुनी
> गळयांतली वनमाल तुझ्या ती
> घ्यावयास गुंफुनी । झडकरी ॥ सोड सख्या ॥
> रात्रभरीं खेळुनी । तुजसवें
> माझा जो शृंगार बिघडला
> सुधराया तो तरी । झडकरीं । सोड सख्या ॥

'कोणता मानूं चंद्रमा' हे गुणवंतरावांचे सर्वप्रसिद्ध सुरम्य शृंगारगीत एका रीतिकालीन कपोलकल्पित हिंदी कवितांवरून स्फुरले आहे की काय ते कळत नाहीं परंतु गृहणीच्या गालाला स्वयंपाक करताना काजळी लागावी आणि तितक्यात त्याला पतीच्या अंगुलीचा स्पर्श व्हावा, व तिचे संपूर्ण मुखमंडल बावन कशी सोन्याच्या कांतीसारखे उजळून निघावे, तद्वत, गुणवंतरावांच्या ईश्वरदत्त प्रतिभेचा स्पर्श होताच मुळातील हिंदी कवितांची कांती शतगुणित होऊन फाकली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकदा राजज्योतिषांनीं ग्रहणाचा योग असल्याचे भाकित केले परंतु ग्रहण लागले नाही. तेव्हा महाराजांनीं राज्यसभेंत ज्योतिर्विदांना ग्रहण का लागलें नाही याचे स्पष्टीकरण करण्याची आज्ञा केली. राजाच्या प्रश्नाचे एखाद्या ज्योतिर्विदानें उत्तर द्यावयाचे, त्याऐवेजी राजकवि गुणदेव उठून उभे राहिले आणि म्हणाले,– 'ग्रहण लागणार होते. चंद्राचा ग्रास घेण्यासाठी राहू टपून बसला होता. पण त्याचवेळीं राणीसाहेब सौधावर ग्रहण पाहण्यास उत्सुक होत्या. त्यामुळे राहू बुचकळयात पडला. महाराणींचा मुखचंद्र आणि आकाशांतला पूर्णचंद्र पाहून यांपैकी खरा चंद्र कोणता याचा त्याला पेच पडला. त्या पेचात वेधाचा काळ टळला. त्यामुळे ग्रहण लागलें नाहीं" * मूळ कल्पनेला गुणवंतरावांनीं आपल्या कल्पनाशक्तीनें उत्तम उठाव दिला असून तिला सर्वथैव नवीन रूप प्राप्त करून दिलें आहे.

'कोणता मानूं चंद्रमा' या त्यांच्या गीताचा प्रारंभ 'भूवरीचा कीं नभींचा ?' या शंकेने झाला आहे. पुढे संशय संभ्रमांत परिणत होऊं लागला आहे. पण चंद्रावर कलंक आहे असा पुढे व्यतिरेक आहे. नंतर चंद्रमुख आणि मुखचंद्र यांची कल्पना चमत्कृतीने युक्त अशी साम्य वैषम्यदर्शक तुलना असून अन्वयव्यतिकानें शेवटीं प्रियेच्या मुखचंद्रास श्रेष्ठत्त्व प्रदान करण्यांत आले आहे. 'संधिकाळ जंवचुंबी एका' या चरणात 'संधि' या शब्दावर सुंदर श्लेष साधण्यात आला आहे. प्रिया आकाशाच्या आरशात आपले रूप पाहात आहे. त्यांत तिचे प्रतिबिंब पडले आहे. लोक त्या प्रतिबिंबालाच चंद्र समजतात अशा मनोहर कल्पनेने गुणवंतरावांनीं या गीताचा शेवट केला आहे. परंतु शेवट करता करता 'चंद्र कोणता, वदन कोणते, शशांक मुख कीं मुख शशांक तें, निवडतील निवडोत जाणते' या चरणांतील 'जाणते' या विशेषणानें त्यानीं कळत न कळत काव्यांतील कपोलकल्पित कल्पनांची फाजील चिकित्सा कल्पून त्यांचा कीस काढणाऱ्या अरसिकांना एक बारीक चिमटा घेतला आहे.

गुणवंतरावांनीं आपल्या या गीताला 'सुखद संभ्रम' हे नाव दिलें असलें, तरी त्यात 'संभ्रमा' पेक्षा 'संयश'च अधिक आहे. हेच गीत चालू विमानयुगांतील एखाद्या तरुणाला स्फुरले असते तर त्याने आपण चंद्राला प्रियेचे मुख मानून विमानाने त्यावर उड्डाण केले खरे. परंतु त्यानंतर ते प्रियेचे मुख नसून चंद्र आहे असे आपल्या लक्षात आले असे वर्णन केले असते, 'ससंशय' आणि 'भ्रांतिमान्' या दोन अलंकारांत किंचित् भेद आहे. 'ससंशयां'त निव्वळ संशय असतो. पण 'भ्रांतिमाना'त भ्रमिष्टाप्रमाणे प्रत्यक्ष कृती घडते. गुणवंतरावांच्या गीतांत तशा कृतीचें वर्णन नाहीं. त्यांत केवळ काव्यमय शंकाकुलता आहे.

एकोणिशे एकवीस सालीं बडोद्यास कै. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते. त्या अधिवेशनात गुणवंतरावांनी आपलें हे गीत गाऊन दाखविले होते; आणि अनेक मान्यवर साहित्यिकांची वाहवा मिळविली होती. या गीतातील श्रृंगाररस, भिन्न भिन्न अलंकार, वैदर्भीरीति, प्रसाद गुण इत्यादिकांमुळे ते श्रोत्यांना मान्य झाले होते. श्रोत्यांत महाराणी चिमणाबाई साहेब गायकवाड होत्या. त्यांनी आनंदराव कृष्णाजी टेकाडे, गुणवंत हनमंत देशपांडे आणि यशवंत दिनकर पेंढारकर या कवींना राजवाड्यात पाचारण करून काव्यगायनानंतर त्यांचा सन्मान केला होता. 'दऱ्याखोऱ्यातला आला कवि हा खास दर्बारा। मराठ्याच्या महालक्ष्मी तुला घे शाहिरी मुजरा' हा गज्जल यशवंतांना त्या प्रसंगी स्फुरलेला आहे.

निसर्गाप्रमाणेच साहित्य हे नित्यनूतन, नित्य तरुण आणि नित्य रुचिर आहे. वाङमयात आणि विज्ञानात महदंतर आहे. Bulwer Lytton म्हणतो,– In science read by preference the newest works; in literature, the oldest. The classics are always modern." वस्तुत: साहित्यात 'कालचें' आणि 'आजचे' असा भेदभाव असण्याचें काही कारण नाही. गुणवंतरावांची 'काल' जितकी मनोवेधक होती, तितकीच 'आज' आहे. जो मर्मज्ञ आणि रसज्ञ असेल, तो स्थलकाल व्यक्तित्त्व निरपेक्ष विचार करतो. गुणवंतराव आपला साहित्य विचार मांडताना म्हणतात,– " अंत:करणाला पीळ पाडून निघणारे व समवृत्ति श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या अंत:करणाला पीळ पाडणारें तेंच खरें काव्य होय. मग हा पीळ बालविधवांच्या मुक दु:खाने पडो, रंजल्या गांजल्यांच्या आर्तनादाने पडो, निस्सीम

* मूळ हिंदी कवितेकरितां सप्टेंबर १९१६ चा मासिक मनोरंजनाचा अंक पहा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राष्ट्रप्रेमाने पडो, श्रद्धायुक्त धर्म भावनेने पडो, अढळ तत्त्वजिज्ञासेने पडो किंवा अन्य कोणत्याही सात्त्विक तीव्र भावनेने पडो. केवळ बुद्धीला आनंद देणाऱ्या काव्याचा प्रकार कनिष्ठच समजला पाहिजे. परंतु खऱ्या काव्यासही माझ्या मते कलेची जोड पाहिजे. कलेशिवाय तें खुलून दिसत नाहीं. भावना हा काव्याचा आत्मा व कला हे त्या आत्म्याचे सुंदर शरीर आहे. या दर्जाच्या काव्यातही व्यंग्य काव्य त्यांतल्या त्यात श्रेष्ट समजले जाईल. खऱ्या काव्यासही, उचित व आकर्षक भाषा, उचित वर्णनें व दृष्टांतोपमादि अलंकार, उचित चाल, राग किंवा वृत्त योजना, अशी औचित्यदृष्टीची कसोटीही लावणें अत्यावश्यक असते. भावनामय काव्यांतही काव्य विषयाच्या उच्चनीच दर्जावरून काव्याचा उच्चनीच दर्जा ठरविला पाहिजे. श्रेष्ठ प्रतीच्या काव्यरचनेसाठी भावनेची तीव्रता, भावित विषयाचा उच्चपणा, भाववर्णन, वृत्तादिकांचें औचित्य, व्यंग्यादि काव्यगुण अवश्य लागतात'*

गुणवंतरावांचा आणि माझा असा साक्षात् असा संबंध फार थोडा आला. चव्वेचाळीस वर्षांपूर्वी मी नागपुरला माझ्या चुलत्यांकडे आलो, त्यापूर्वीच गुणवंतरावांनी नागपूर सोडले होते आणि वाटखेडला जाऊन आपली शेतीवाडी पाहण्याचे काम सुरू केले होते. गुणवंतरावांचे श्वशुर कै. नारायण रंगनाथ अळेकर हे विविधज्ञानविस्तार या प्रख्यात मासिकाचे लेखक होते. त्यांच्याकडे गुणवंतराव मधूनमधून येत. तेव्हा आनंदराव टेकाडे यांच्या बिऱ्हाडी त्यांची भेटगाठ पडत असे. माझे चुलते कै. गजानन नरहर पंडित यांनीं 'विदर्भवीणे'चे संपादन केले आहे. ते गायक आणि वादक होते. यवतमाळला मी त्यांच्याकडे गेलो म्हणजे गुणवंतरावांचे काव्य ऐकण्याचा योग येत असे. साहित्यिकांच्या खेळाच्या मेळाव्यांपासून गुणवंतराव नेहमीच चार हात दूर असतात. उगाच गर्दीत शिरावयाचे आणि इतरांना बाजूला लोटून आपण सर्वांत पुढे मिरवावयाचें हा त्यांचा स्वभाव नाही. आपण बरे की आपले काव्य बरे असे ते काहीसे एकमार्गी आहेत.

* काव्यरत्नावलि. डिसेंबर १९२६.

गेल्या महिन्यात विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन साजरा झाला. त्यानंतर कवींची आणि काव्यगायकांची एक सहसभा झाली. तिच्यात गुणवंतराव आणि मी एकमेकांना खेटून बसलो होतो. काव्यगायनाचे फितेवरील ध्वनिमुद्रण वाजत होते. काव्यगायन अवश्य हवें. पण त्यांत काव्याला ढळ लागता कामा नये असा गुणवंतरावांचा पक्ष होता. या उलट काव्यगायनात गायनाला अग्रक्रम आहे. त्यामुळे काव्यगायनाने गायनाच्या सोयीसाठी क्वचित् एखादी दुसरी सवलत घेण्यास हरकत नसावी असा गायकांचा पक्ष होता.

काव्यकला आणि गानकला या परस्परांना पोषक आहेत यात शंका नाही. पण गायनकलेचे मुख्य माध्यम सूर किंवा स्वर आहे. गायनामध्ये शब्द केवळ निमित्त मात्र असतात. उलट काव्यकलेंत शब्दांना आणि अर्थाला महत्त्व आहे. तेव्हा काव्यातील शब्दांना जर गायनांतील स्वरांची जोड दिली तर काव्याला अधिक उठाव मिळेल मात्र ही जोड जितक्यास तितकीच दिली पाहिजे. शब्दांनी जो रस ध्वनित होतो, तोच रस स्वरांनीं ध्वनित झाली पाहिजे. अर्थात् काव्य आणि संगीत यांचा यथायोग्य समन्वय साधला पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंबई साहित्य संघांतील परिसंवादाच्या अनुषंगाने

वर्धा साहित्य संमेलनाची फलश्रुती

— श्रीकान्त राय.

दिनांक २५ जानेवारी १९६९ रोजीं सायंकाळी ६ वाजतां मुंबई साहित्य सघामध्यें 'वर्धा साहित्य संमेलनाची फलश्रुती ' या विषयावर सर्वश्री बापूराव नाईक, प्रा. व. दि. कुळकर्णी, प्रा. सरोजिनी शेंडे, प्रा. राम पटवर्धन, प्रा. पु. शि. रेगे (संमेलनाध्यक्ष) व श्री. वा. रा. ढवळे यांची भाषणें झाली. कर्मधर्म संयोगाने मी त्याच दिवशीं सकाळीं मुंबईत येऊन पोहोचलों वर्धा येथील साहित्य संमेलनांत उपस्थित राहण्याचा कार्यक्रम मी निश्चित केला असूनहि कांही अपरिहार्य कारणांमुळे ऐनवेळीं मला वर्ध्यास जातां आलें नव्हते. त्यामुळे उपरोक्त परिसंवादाद्वारां मला वर्ध्याचें साहित्य संमेलन कसें झालें हें समजले व शिवाय मुंबईच्या साहित्यिकांच्या मतें या साहित्य संमेलनाची फलश्रुतीहि मला कळेल या दुहेरी हेतूने मी कटाक्षाने वरील परिसंवाद ऐकण्यास गेलों. या परिसंवादाचा अहवाल विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांना, विदर्भांतील साहित्यिकांना आणि वर्धा साहित्य समेलनाच्या आयोजकांना उपयुक्त वाटेल अशा कल्पनेने हें लेखन.

वरील परिसंवादांत साहित्य संमेलनाच्या स्वरुपाविषयीं आतां सनातन म्हणून माहित झालेले कांही मुद्दे उपस्थित करून त्यांना रूढ उत्तरें देण्यांत आलीं. हे मुद्दे म्हणजे साहित्य संमेलन हें साहित्यिकांचें व साहित्यविषयक चर्चा व परिसंवाद करून तत्वबोध काढण्याचें साघन असें साहित्यिक स्वरुपाचें संमेलन असावें की आता रुढ झालेल्या महोत्सवी स्वरुपांतील तें मराठी भाषिकांचें संमेलन असावे ? साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी राजकीय क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींनी उद्घाटक, प्रमुख पाहुणे इत्यादि स्वरुपांत निमंत्रण देऊन त्यांच्या सोयी गैरसोयींवर साहित्य संमेलनाची वेळ ठरवावी व बदलावी किंवा नाही ? साहित्य संमेलनामध्यें मराठी साहित्याच्या निराळया क्षेत्रांतील व्यक्तींनी उत्स्फूर्तपणें उपस्थित राहावें की त्यांनी प्रवासखर्च आदिसाठीं रकमा मिळतील अशा स्वरुपाच्या निमंत्रणांची वाट बघावी ?

या मुद्यांचें रुढ पद्धतीने निराकरण करतांना श्री. बापूराव नाईक यांनी साहित्य संमेलनें भरविण्याच्या प्रथेचा इतिहास सांगून महामंडळाच्या घटनेचा व उद्दिष्टांचा निर्वाळा दिला आणि अशा संमेलनाची आर्थिक बाजू लक्षांत घेतां अधिकाधिक मराठी माणसांनी या संमेलनांस उपस्थित राहून तीं संमेलनें महोत्सवी स्वरूपाची मराठी साहित्याची पंढरी करणाच्या अर्थशास्त्रीय दृष्टिकोनावर भरदिला. तसेंच श्रीमती इंदिरा गांधी संमेलनाला येणार या कल्पनेवर आधारून केलेला अर्थ कारणाचा अंदाज आणि प्रत्यक्षांत त्यांच्या शिवाय भरलेल्या साहित्य संमेलनासाठी आयोजकांना लाभलेला आर्थिक आधार यांतील तफावतीवर राजकीय पुढाऱ्यांच्या उपस्थितीचें समर्थन करण्यांत आले. साहित्य संमेलनाला साहित्याची पंढरी म्हटल्यानंतर निमंत्रणाची वाट न पाहतां उत्स्फूर्तपणें साहित्यिकांनी उपस्थित कां होऊं नये या प्रश्नाचें उत्तर देतांना उपरोक्त परिसंवादात मराठी साहित्यिकांचे दारिद्र्य व हीं साहित्य संमेलनांतील उपस्थिती उपस्थित राहणाऱ्या साहित्यिकांना निश्चित फल काय देते हा प्रश्न अशा दोन कारणांचा निर्देश करण्यांत आला.

प्रा. व. दि. कुळकर्णी यांनी वर्ध्याच्या साहित्य संमेलनांतील अनेक क्षणचित्रें अतिशय प्रभावीपणें उभीं करून वर्ध्याचें साहित्य संमेलन हें विदर्भियांच्या अतिथ्य शीलतेचें व मोकळेपणाचें एक निदर्शक होतें याचीं कल्पना दिली. ज्या वर्ध्याच्या परिसरांत महाराष्ट्राने मान्य केलेल्या आधुनिक संत विनोबाजींचे परंधाम आहे व ज्या परिसरांत विनोबांनी आपले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निबंध लिहून ते 'मधुकर' या पुस्तकांत संकलित केले व त्यांत वडोद्याच्या राजाखालीं भरलेल्या साहित्य संमेलनांतील मिष्टान्नपूर्ण आहाराचा उल्लेख त्यांनी साहित्य देणा-या साहित्यिकापुढे ठेवलेल्या 'अंबोण' या सदरांत केला त्या वर्ध्यामध्ये साहित्य समेलन भरून कुळकर्णींनी मान्य केलेल्या अतिथ्यशीलतेच्या संदर्भात निदान वर्धा वासियांना विनोबांच्या निबंधां-तील 'अंबोणा'ची आठवण होणें गैर नव्हतें. आणि म्हणून केवळ विनोद म्हणून (मनांत कोणतीहि कटुता न बाळगतां) या संमेलनाचा 'अंबोण संमेलन' म्हणून उल्लेख केला गेला असल्यास त्यांत वावगें मानण्यासारखें कांही नसावें.

प्रा. व. दि. कुळकर्णी यांनी व इतर वक्त्यांनी उल्लेख केल्यानुसार वर्ध्याच्या साहित्य संमेलनांत सर्व मिळून पन्नासपेक्षा अधिक प्रतिनिधी मुंबईपुण्याकडून आले नसावेत. व. दि. कुळकर्णी यांनी तर पुढे असा हवाला दिला की मराठवाड्यांतून या संमेलनास एकहि प्रतिनिधी उपस्थित राहिला नाही. तरीहि सदर संमेलनांतील प्रत्येक कार्यक्रमास सहा सात हजार श्रोत्यांची उपस्थिती लाभली होती. व प्रामुख्याने विदर्भांतील साहित्यिकांचे हें 'वैदर्भीय संमेलन' झालें. या उपस्थितीस वर्ध्यांतील बऱ्याच मोठ्या प्रमाणांतील लोकसंख्या विद्यार्थ्यांची व शाळा कॉलेजांतील संबंधित शिक्षकांची असल्याचा निर्वाळा देण्यांत आला.

विदर्भ साहित्य संघ व वर्धा येथील संमेलनाचे संयोजक यांच्या दृष्टीने विचार करतां पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथून मातब्बर साहित्यिकच काय तर साधे श्रोते प्रतिनिधी देखील पुरेशा संख्येत उपस्थित राहिले नसतांना ते साहित्य संमेलन यशस्वी करण्याचा अटीतटीचा प्रयत्न संमेलनाच्या संयोजकांनी व स्थानिक जनतेने केला व त्यांत जर एक वरील पार्श्वभूमींवर 'वैदर्भीय संमेलन' झालें असलें तर त्याचा दोष विदर्भ साहित्य संघ किंवा वर्धा समेलनाचे संयोजक यांच्याकडे कसा येऊं शकतो? शिष्ट साहित्यिकांना (शिष्ट हा शब्द मी संस्कृत शब्दाच्या अर्थाने वापरीत आहे) खर्च व मानधन देऊन साहित्य संमेलनांत उपस्थित ठेवण्याची व त्यांच्या परिसंवादादि संमेलनांतील कार्यक्रम योजनाबद्धपण आखण्याची जबाबदारी वर्धा साहित्य संमेलनाच्या संयोजकांना योग्य प्रकारें पार पाडतां आली नाही असा मुंबई साहित्य संघातील उपरोक्त परिसंवादाचा सूर होता. आजपर्यंतच्या दृष्टीने अधिकारी साहित्यिकांना गेलीं नसल्यास या 'दुर्व्यवस्थेचें समर्थन करतां येणार नाही. तथापि भावी साहित्य समेलनांच्या दृष्टीने एक मुद्दा शिल्लकच राहील —की मराठी साहित्य संमेलन हें जर 'मराठी साहित्याची पंढरी' मानावयाचें असेल तर वारकऱ्याच्या श्रद्धेने संमेलनांच्या साहित्यिक कार्यवाहींत भाग घेण्यासाठी मराठी साहित्यिकांनी स्वयंस्फूर्तपणे उपस्थित राहाणे आवश्यक आहे व ज्या तथाकथित श्रेष्ठ व अहंमन्य मराठी साहित्यिकांना मराठी साहित्य रसिकांच्या (अर्थात् वाचकांच्याही) सहजीवनाची मातब्बरी वाटत नसेल त्यांनी वारकरी म्हणून नव्हे तर ही मराठी साहित्याची पंढरी यशस्वी करण्यासाठी 'पांडुरंग' म्हणून ती त्या साहित्य संमेलनास उपस्थित राहाणें आवश्यक आहे. कारण 'विटेवरी उभा विठ्ठल' आपल्या भक्तांच्या भक्तीबद्दलची कृतज्ञता विसरून पांडुरंग होणार नाही.

प्रा. सरोजिनी येंडे यांनी प्रा. व. दि. कुळकर्णी यांच्याच तालसुरांत वर्ध्याच्या साहित्य संमेलनाची मोकळेपणा, व्यवस्था, अतिथ्यशीलता यांची ग्वाही दिली. स्त्री लेखिकांचे वेगळें संमेलन असावे कां? हा त्यांचा मुख्य साक्षेपी प्रश्न होता. अर्थात् या प्रश्नाचें उत्तर मुख्यत: स्त्री लेखिकांनीच द्यावयाचें आहे. तथापि असें म्हणतां येईल की आजवरच्या साहित्य संमेलनांत भिन्न साहित्य शाखांची व भिन्न साहित्य प्रवृत्तींची (औपचारिक वा अनौपचारिक) उपसंमेलनें भरतात व भरत आलीं आहेत. (प्रा. राम पटवर्धन यांनी वर्धा संमेलनांतील अशा अनेक अनौपचारिक उपसंमेलनांचा आपल्या भाषणांत उल्लेख केला.) आणि या दृष्टीने स्त्री साहित्यिकांचें एक उपसंमेलन भरविणे अप्रस्तुत नसावें. अशा उपसंमेलनाने स्त्री साहित्यिकांना संमेलनांतील इतर चर्चा परिसंवादादि कार्यक्रमांत भाग घेण्यास कुठलाहि प्रत्यवाय येत नाही. अर्थात् केवळ निमंत्रितांनीच अशा कार्यक्रमात भाग घ्यावा ही रूढी लक्षांत घेतां संमेलनाच्या संयोजकांनी स्त्री साहित्यिकांना अशा कार्यक्रमात योग्य ते प्रतिनिधित्व देणें क्रमप्राप्त होतें.

प्रा. राम पटवर्धन यांच्या भाषणांत दोन प्रमुख मुद्दे होते. एक म्हणजे वर्ध्याचें साहित्य संमेलन हे व्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पीठाच्या बाजूने केवळ वृद्ध साहित्यिकांनी गाजविलें व त्यामूळे अस्वस्थ व सळसळणाऱ्या रक्ताच्या तरुण साहित्यिकांना या संमेलनांत योग्य वाटा मिळाला नाही. अर्थात् या मुद्याचें विश्लेषण करतांना प्रा. राम पटवर्धन यांना या वृद्ध व तरुण वर्गीकरणामध्यें आपण स्वतः कुठे आहोत हा प्रश्न किंचित् काळ तरी पडला. आज वृद्ध गणल्या जाणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या ऐन उमेदीच्या व तारुण्याच्या काळांत साहित्य क्षेत्रांत केलेल्या कामगीरीचे मोल आज त्यांच्यावर 'वृद्ध' असा शिक्का मारून विसरता येणार नाही. तथापि प्रा. राम पटवर्धन याची मुख्य खंत त्यांच्या दुसऱ्या मूद्यांत होती व तो मुद्दा म्हणजे 'आजची तरुण साहित्यिक पिढी व कालची वृद्ध प्रतिष्ठित साहित्यिकांची पिढी यामधील दुवा मधल्या पिढीला सांधतां न आल्यामुळे या दोन पिढ्यांमध्ये एक दरी निर्माण झाली आहे. मध्यंतरीच्या काळांतील साहित्यांत एक स्थित्यंतरगुण होता. साहित्य हें सतत स्थित्यंतरशील आहे का व मध्यंतरीच्या काळातील साहित्याला ही स्थित्यंतरशीलतेची कसोटी कांही वेगळ्या प्रमाणांत लागू शकते का हा साहित्य समीक्षकांचा विषय आहे व प्रा. पटवर्धनाच्या मुद्याचा अधिक सखोल व समर्पक मरामर्श घेतला जाणे उपकारक ठरेल.

संमेलनाध्यक्ष प्रा. पु. शि. रेगे व श्री. वा. रा. ढवळे यांची भाषणें वेळेअभावी त्रोटक झाली. श्री. वा. रा. ढवळे यांनी वर्धा साहित्य संमेलनाच्या फलश्रुतीचा सांगोपांग मरामर्श त्यांच्या 'दीपलक्ष्मी' या नियतकालिकांतील लेखांत घेतला असल्याचा निर्वाळ दिला. त्या अनुरोधाने योग्य वेळी (म्हणजे प्रकाशित झाल्यावर) सदर लेखाचे परिशीलन करणें आवश्यक ठरेल.

वर्धा येथील साहित्य संमेलनांतील मोकळेपणाचा अतिरेक सुचविणारी एक घटना पु. शि. रेगे यांनां अधिकार समर्पण करण्याच्या प्रसंगाची होती असें वरील परिसंवाद ऐकतांना वाटलें – प्रा. पु. शि. रेगे यांना वरण्यासाठी सभा हातांत माला घेऊन उभी असल्याचे रूपक 'फिरवून' पूर्वाध्यक्षानी श्री. रेगे यांनाच अधीर झालेल्या वधूची भूमिका दिली. या विनोदाला 'धार' असल्यामुळे व पूर्वाध्यक्ष डॉ. कोलते हे वैदर्भीय लेखक असल्यामुळे हा विनोद वैदर्भीयेतरांना बोंचणें अस्वाभाविक नाही. मात्र या दोन अध्यक्षांचा उल्लेख करीत असतांना डॉ. कोलते यांचा 'संत वाङमयाचे' उपासक व प्रा. पु. शि. रेगे यांचा 'पसंत वाङमयाचे' अध्वर्यु असा उल्लेख एक शब्द लालित्याचा प्रयोग या दृष्टीने पाहणें खेळकर वृत्तिला धरून होय. कारण पसंत वाङमय म्हणजेच पॉप्युलर लिटरेचर हें कमी दर्जाचें अशी कोणतिहि अध्याहृत हें कटुता या विधानात नसावी तसें पाहतां संतवाङमय हे त्याला काळातच नव्हे तर चिरकाल पसंत वाङमयच होतें व राहिलें आहे.

उपरोक्त परिसंवादांत डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. रा. शं. वाळिंबे, श्री. आ. रा देशपांडे (अनील) यांच्याहि भाषणांचा परामर्श घेण्यांत आला. तसेंच वऱ्याच वर्षांत कवि संमेलनाध्यक्ष लाभला नसल्याच्या श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या विधानांतील चुकीचा उल्लेख कवि वि. द घाटे, अनील, आणि कुसुमाग्रज यांवर झालेल्या अन्यायाच्य दृष्टीने करण्यांत आला. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष म्हणून श्री. माडखोलकर यांनी हे विधान केल्यामुळे त्याला पुन्हा प्रादेशिकतेचा वास आहे की काय अशी ऐकतांना शंका आली.

मोकळेपणाने झालेल्या वर्धा येथील साहित्य संमेलनांत विदर्भाची प्रसिद्ध अतिथ्यशीलता अनुभवावयास मिळून, श्री. वि. द. घाटे यांच्या न मांडल्या गेलेल्या ठरावावर विचार करण्याची आवश्यकता महामंडळास वाटणें व त्यानुसार साहित्य संमेलनाच्या स्वरूपावर विचार होऊं घातला जाणें आणि (श्री. वा. रा. ढवळे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे) वर्धा येथे काही कालापूर्वी भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या चुका दुरूस्त करून काही अप्रिय गोष्टी धुऊन टाकण्याची संधी वर्ध्याच्या आयोजकांना मिळणें ही वर्ध्याच्या साहित्य संमेलनाची त्रिविध फलश्रुती म्हणून समारोपात सांगण्यांत आली.

मुंबई साहित्य संघांतील कार्यक्रमांस उपस्थित राहिल्यामुळे माझ्या मनाला समजलेली फलश्रुती आवश्यकतेच्या या काळांत निदान मराठी साहित्याचा विचार केवळ मराठी साहित्य म्हणूनच व्हावा व अशा निरोगी विचारांना प्रादेशिक रंग वा वास येऊं न देण्याची जबाबदारी मराठी साहित्यिकांनी स्वीकारावी ही होय.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचे अध्यापन

डॉ. सुनील सुमेदार.

वर्धा येथील साहित्य संमेलनात ' मराठीचे अध्यापन ' यासंबंधी झालेल्या चर्चासत्रात डॉ. सुनील सुमेदार यांनी जे विचार मांडले ते त्यांच्याच शब्दात येथे दिले आहेत.

-संपादक

संमेलनाध्यक्ष रेगे, आजच्या परिसंवादाचे अध्यक्ष, उपस्थित गुरूजन आणि मित्रहो—

मराठीच्या अध्यापनाच्या समस्यांचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या या संमेलनात मी थोडया संकोचाने भाग घेत आहे. संकोचाचे कारण असे की मी जरी भाषा विषयाचा अध्यापक असलो, तरी मराठीचा नाही. मी आहे इंग्रजीचा.

पण माझ्या मनात असा विचार येतो की मी इंग्रजीचा अध्यापक केवळ अपघाताने झालेलो आहे. कॉलेजात प्रवेश करण्यापूर्वीपासून माझे लेख मराठी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले होते. त्यामुळे आपण जमले तर मराठीचाच अध्यापक व्हावे, असे मी नागपूर महाविद्यालयात दाखल झाल्यापासूनच योजलेले होते. आम्हाला त्यावेळी गुरुवर्य डॉ. कोलते आणि डॉ. मा. गो. देशमुख यांच्या व्यासंगपूर्ण अध्यापनाचा लाभ मिळत होता. त्यांच्यासारखे अध्यापन आपल्याला करता आले पाहिजे, अशी माझी महत्वाकांक्षा होती. साहजिकच एम्. ए. ला मी मराठी विषयात माझे नाव नोंदविलेले होते.

मी सुरूवातीला म्हणालो, तो अपघात याच वेळी घडला. आम्हाला शिकवावयाला एक ज्येष्ठ प्राध्यापक आलेले होते. त्यांनी पहिल्याच तासाला बजावून सांगितले की, "वाङ्मयाच्या वेगवेगळया शाखांची विभागणी ही अत्यंत कृत्रिम आहे. काव्य काय, कादंबरी काय, कथा काय आणि नाटक काय— सर्व वाङ्मय प्रकारात एकाच प्रकारचा साहित्याचा आनंद मिळतो. असे पहा, बायका मजी करतात. एकाचा आकार उंटासारखा, दुसऱ्याचा घोडयासारखा, तिसऱ्याचा बैलासारखा आणि चौथ्याचा माकडासारखा दिसतो, पण चव इथून तिथून एक ! बेसनाची आणि कांद्याची. वाङ्मयाचेहि तसेच आहे. "

वाङ्मयानंदाची ही मीमांसा ऐकल्यावर मला वाटले की आपण स्वयंपाक घरांतून बाहेर पडावे, त्यामुळे मी उठलो आणि शेजारच्या वर्गात जाऊन बसलो. तेथे प्रा. एकनाथ ईश्वरन् हे शिकवीत होते. प्रा. ईश्वरन् यांची ख्याति वस्तुत: पीरिएड चांगला घेण्यापेक्षा अजिबात न घेण्याबद्दल होती. एकदा पाच मिनिटातच त्यांनी तास संपवला आणि प्राचार्यांनी जेव्हा कारण विचारले तेव्हा ते म्हणाले, " मी तास लवकर सोडला नाही, गेला पीरिएडच पांच मिनिटे जास्त घेतलेला आहे. " आता बोला ! तरीहि हे मान्य केलेच पाहिजे की ते जे काही शिकवीत ते पहिल्या दर्जाचे असे. ते त्यावेळी 'रेनासन्स'चे विवेचन करीत होते. त्या व्याख्यानाची मला एवढी भुरळ पडली की मी मराठी सोडून इंग्रजी हा विषय घेतला.

तथापि, त्यामुळे माझा मराठीचा व्यासंग काही तुटला नाही, उलट त्याला एक आवश्यक असे परिमाण लाभत आहे, असे मला वाटले. अर्वाचीन मराठी भाषा ही इंग्रजीवर एवढी जोपासलेली आहे की इंग्रजीचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांगोपांग अभ्यास केल्याशिवाय मराठीचे अध्यापन केवळ अशक्य आहे, संस्कृत उत्तम आल्याशिवाय जुने मराठी साहित्य जसे समजावयाचे नाही, तसेच इंग्रजी आल्याशिवाय अर्वाचीन साहित्यातील मूल प्रेरणांचे आकलन व्हावयाचे नाही.

मी उदाहरण देतो. मराठीतील आद्य टीकाकार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी आपली टीकालेखनाची चिरेबंदी पद्धत ही मोल्टनच्या विगमनात्मक तर्कपद्धतीवर बसविलेली आहे. ही गोष्ट कोल्हटकर लेखसंग्रह वाचून समजणारी नाही. कारण, त्यात मोल्टनचा उल्लेख फक्त दोनदा आणि तोहि ओझरता आलेला आहे. हे ज्ञान होण्याणाठी मूळ मोल्टन वाचनात आलेला असणे हेच आवश्यक आहे. मोल्टनचा शेक्सपिअरच्या नाटकावरील ग्रंथ नागपुरातल्या किती वाचनालयात आहे? एखादा असला तर तो गेल्या वीस वर्षात किती प्राध्यापकांनी वाचला आहे? मोल्टनला रजा देऊन कोल्हटकरांच्या टीकाशास्त्राचे अध्ययन कसे पल्लवग्राही होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. हीच कहाणी देवलांच्या संशयकल्लोळाची. 'फाल्गुनराव हा मूळचा विलायती. एवढीच माहिती आपल्याला देवल देतात. वस्तुत: तो मोलिएचा 'गानारेल' या नाटकावरून घेतलेला आहे. अधिक नेमके सांगावयाचे तर मर्फी या इंग्रजी नाटककाराने मोलिए जो उपयोग केला, त्यावर फाल्गुनराव आधारित आहे. पण अभ्यासकाने येथे थांबून चालणार नाही, रोमन आणि ग्रीक प्रहसनात अशा पात्राचे मूळ त्याने शोधले पाहिजे, हे करण्याची पात्रता आणि प्रवृत्ति किती अध्यापकात आढळते?

कै. मर्ढेकर यांच्यानंतर लिहू लागलेल्या टीकाकारांच्या लेखनात 'सर्व कला सतत संगीताच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात' हे वाक्य वारंवार येते. हे वाक्य पेटरच्या All art consistently aspire to the conditions of music या शंभर वर्षांपूर्वी काढलेल्या उद्‌गाराचा अनुवाद आहे. इंग्रज टीकाकार सांगतात की हा विचार पेटरचाच. पण हे एवढ्यापुरतेच खरे आहे की पेटरने तो विचार जर्मनीतून प्रथम इंग्लंडमधे आणला, पेटरच्या ग्रंथाची पहिली आवृत्ति सुदैवाने नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. त्यात हे वाक्य 'इटॅलिक्स' मधे लिहिलेले आहे. म्हणजे ते पेटरने घेतलेले असावे किंवा त्याला त्या विचारावर आघात (emphasis) द्यावयाचा असावा, मी शोध घेतला तेव्हा असे आढळले की हेच वाक्य शॉपेनहॉवरने लिहून ठेवलेले आहे! त्याच्याहि पूर्वी कोणी हा विचार मांडला होता काय, मूळचा तो कोणाचा, याचा शोध आपण घेतला पाहिजे. विसाव्या शतकातील केवळ साहित्यच नव्हे तर चित्र आणि शिल्प या दोन्ही कलांवर या विचाराचा पगडा आहे. हा सगळा इतिहास जर माहीत नसला, तर गेल्या पंचवीस वर्षांतील नवसाहित्याचा परामर्श आपण कसा काय घेणार आहोत?

वाईट या गोष्टीचे वाटते की मराठीत लिहिणारे भले भले लेखक या गोष्टींची दखल घेत नाहीत. आपल्याला आगरकरांचे उदाहरण दिले तर आश्चर्य वाटेल, मिल्ल आणि स्पेन्सर प्रभृति तत्वज्ञांचे आधार त्यांच्या लेखनात वारंवार येतात. त्यांच्या वेळी नेमलेले 'प्रॉस्पेक्टस' मी काढून पाहिले तेव्हा ही सगळी मंडळी त्यात आढळली! आपण नेमलेल्या अभ्यासक्रमापलिकडे जावयाचे नाही असे तर ठरविलेले नाही? मराठीच्या एम्. ए. च्या अभ्यासक्रमात हड्सनचे 'ऑन इंट्रोडक्शन टु दि स्टडी ऑफ लिटरेचर' हे पुस्तक गेली पंचवीसतीस वर्षे नेमलेले आहे. हा हड्सन इतका सामान्य ग्रंथकार आहे की कोणत्याहि कोषात आणि इतिहासात त्याचे नाव आढळावयाचे नाही. आणि या पुस्तकात त्याने 'पॉलिटेक्निक'च्या विद्यार्थ्यांपुढे दिलेली भाषणे संग्रहित केलेली आहेत, त्यांचा दर्जा तो काय असणार? पण आश्चर्य आणि वाईट याचे वाटते की मराठीत पीएच्. डी. चे जे काही प्रबंध प्रसिद्ध झालेले आहेत, त्यात आधारभूत ग्रंथांत हडसनचा हटकून उल्लेख आढळतो. अपवाद असला तर एखाद दुसरा, ही स्थिती फारशी स्पृहणीय नव्हे.

आपली इंग्रजीबद्दल जशी अनास्था आहे, तशीच संस्कृतबद्दलहि. डॉ ग. त्र्यं. देशपांडे यांचे 'भारतीय साहित्यशास्त्र' आपण नेमले आहे खरे पण अभ्यासक्रमात त्यात निम्माच भाग आहे. आपण ज्ञानेश्वरी नेमतो आणि शिकवतो. ज्ञानेश्वरी "भाष्यकारांना वाट पुसत" लिहिलेली आहे असे सांगतो, पण शांकरभाष्याची माहिती करून घेतो काय? शांकरभाष्याचे ज्ञानेश्वरांवर खरोखरी ऋण आहे काय? असल्यास त्याचे स्वरूप काय? याचा विचारहि अद्याप व्हावयाचा आहे.

या सगळ्या अनास्थेचा परिणाम असा झालेला आहे की मराठी हा महाविद्यालयात न जाणाऱ्या भगिनींनो

(पान ३७८ वर पहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

.... पुस्तक परिचय ....

— चंद्रकांत कुळकर्णी.

'प्रदक्षिणा'

[१८४० ते १९६५ या कालखंडातील मराठी वाङ्मयाचे चिकित्सक समीक्षण]

सुधारून वाढविलेली चवथी आवृत्ती : १९६८
प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे

१९४१ साली नाशिक सार्वजनिक वाचनालयाने आपल्या शतसांवत्सरिक उत्सवप्रसंगाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानातून या ग्रंथाची सिद्धता झाली. आणि त्यानंतर गेल्या पंचवीस वर्षात या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. प्रत्येक आवृत्तीच्या वेळी लेखकांनी वेळोवेळी नव्या माहितीची भर घातल्यामुळे या ग्रथाचे महत्व वाढत गेले. अभ्यासकांनी या ग्रंथाचे चांगलेच स्वागत केले. या नवीन आवृत्तीत चरित्रवाङमय (अ. म. जोशी) साहित्य विचार (व. दि. कुळकर्णी) ललित गद्य (भीमराव कुळकर्णी) हे लेख नव्याने घालण्यात आले आहेत. या लेखाचा अंतर्भाव या आवृत्तीत करण्यात आल्यामुळे हा ग्रंथ अद्ययावत व व्यापक झाला आहे,

"मराठी साहित्याची इंद्रायणी सतत वाहत आहे. नवीन नवीन विचार प्रवाहांचे ओघ तिला सतत येऊन मिळत आहे. ताज्या दमाचे लेखक मोठ्या उमेदीने लिखान करीत आहे. जुन्या नव्यांचा संघर्ष चालूच आहे. किंवहुना ह्या संघर्षाच्या तीरांमधूनच साहित्याचे पात्र पुढे पुढे सरकत आहे. प्रवास झाला किती हे मघूनच अजमावून पाहण्यासाठी मागे वळावे लागते. इतिहासातले शिल्लक किती राहिले आणि दिसेनासे किती झाले ह्याची वजावाकी तपासावी लागते नव्या काचामधून जुनी लहान—मोठी माणसे पुन्हा एकदा मोजावीशी वाटतात. गडद वाटणारे रंग निवडलेले असतात. न समजलेल्या व्यक्ती कळल्यामुळे मोठ्या वाटू लागलेल्या असतात. अशा वेळी भूतकालाच्या साहित्याचा आढावा घेणाऱ्या चिकित्सक ग्रंथाची आवश्यकता भासू लागते. 'प्रदक्षिणा' हा आवश्यकतेतून निर्माण झालेला ग्रंथ आहे. गेल्या शे-सवाशे वर्षांतील अर्वाचीन म्हणून संबोधल्या जाणाऱ्या साहित्याच्या अंगाचा धावता परंतु नीटस आढावा प्रस्तुत ग्रंथात आलेला आहे. मराठी साहित्याच्या अभ्यासकांस आणि चोखंदळ वाचकांस 'प्रदक्षिणे' ची ही अद्ययावत् आवृत्ती निश्चितच संग्राह्य वाटेल.

* * *

'आधुनिक भारतीय साहित्य'

[कॉंटेम्पोररी इंडियन लिटरेचर' या मूळ इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद.

प्रकाशक : साहित्य अकादेमी नवी दिल्ली.
मूल्य : रु. बारा.

भारताच्या प्रमुख सोळा भाषांमधून समृद्ध असे वाङ्मय लिहिले जाते. या वाङ्मयाची ओळख इतर भाषीकांना करून देण्याची नितांत आवश्यकता आहे. विविध भारतीय भाषांतील वाङ्मयाची ओळख करून घेण्याची उत्सुकता व त्या भाषांतील अद्ययावत वाङ्मयाची प्रवाहांची माहिती करून घेण्याची जिज्ञासा मराठी वाचकांमध्ये सतत वाढत आहे. या पुस्तकाने ही जिज्ञासा अल्पांशाने पूर्ण होईल.

कॉंटेम्पोररी इंडियन लिटरेचर' या मूळ इंग्रजी ग्रंथाचा प्रस्तुत ग्रंथ हा मराठी अनुवाद. यातील मराठी वाङ्मयावरील मूळ लेख प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांनी लिहिला. व त्याचा मराठी अनुवाद सौ. विजया राजाध्यक्ष यांनी केला आहे. इतर पंधरा लेखांचे भाषांतर एका प्रसिद्ध मराठी लेखकाने केले, जो अनामिक राहूं इच्छितो. या पुस्तकाचे प्रत्येक प्रकरण त्या त्या भाषेतील प्रख्यात समीक्षकाने लिहलेला असल्यामुळे भारतीय वाङ्मयाचा परिचय करून देणारा महत्वाचा समीक्षणात्मक ग्रंथ म्हणून या पुस्तकाचे महत्त्व फार आहे.

* * *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचे अध्यापन (पान ३७६ वरून चालू)

घरवसल्या एम्. ए. करण्याचा विषय ठरत आहे. इंग्रजीच्या किंवा संस्कृतच्या प्राध्यापकाकडे लोक ज्या दृष्टीने पहातात तो आदर मराठीच्याहि अध्यापकांच्या वाटचाला आला पाहिजे. त्यासाठी इंग्रजी किंवा संस्कृत यात एम्. ए. करण्यापेक्षा मराठीत एम्. ए. करणे कठीण आहे असे लोकांना वाटले पाहिजे, ही जबाबदारी आपण घेणार आहोत काय ? आताच प्रा. मालशे यांनी असे सांगितले की मराठीचे विभाग पाडून एकेक विभाग एम्. ए. ला नेमावा. केमिस्ट्रीचे ऑरगॅनिक वा इन-ऑरगॅनिक केमिस्ट्री बायोकेमिस्ट्री असे अनेक विभाग पडतात. पण ही तुलना येथे व्यर्थ आहे. आपण जर असे केले तर घसरणी लागलेल्या गाडीला धक्का दिल्याचे पाप मात्र आपल्याला लागेल.

मराठीच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचा अधिकार असलेले माझे गुरूजन आज समोर बसलेले आहेत. त्यांनी या सूचनांचा अगत्याने विचार करावा अशी विनंती करून मी माझे भाषण आटोपते घेतो.

[ता. ५ जानेवारी रोजी वर्धा येथील साहित्य संमेलनांत दिलेल्या भाषणाचा वृत्तान्त]

विदर्भ साहित्य संघाची विक्रीस तयार असलेली प्रकाशने

	पुस्तके		रु. पैसे
१.	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह : भाग २		३—००
२.	The Vedasthan or The Ancient Home of the Indo-Aryans	ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३—००
३.	प्रयोगक्षम मराठी नाटके	डॉ. मु. श्री. कानडे	१५—००
४.	केशवसुत वाङ्मयसूची	सौ. उज्ज्वल अयाचित	१—००
५.	मराठी वर्णोच्चार विकास	डॉ. द. ह. अग्निहोत्री	१६—००
६.	लोकसाहित्य संपदा	ना. रा. शेंडे	६—००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

७.	नाटककार गडकरी	डॉ. द. रा. गोमकाळे	०—३१
८.	गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार	कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०—५०
९.	गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०—५०
१०.	सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	द. वि. तेंडूलकर	०—५०
११.	गडकऱ्यांची खरी भूमिका	प्रा. भ. श्री. पंडित	०—५०
१२.	गडकऱ्यांची नाट्यशैली	प्रा. रू. पा. पांजणकर	०—५०
१३.	गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी	वसंत वरखेडकर	०—६०
१४.	गडकरीकालीन नाट्यतंत्र व गडकरी	वसंत वरखेडकर	०—६०

सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतात. न मिळाल्यास मागणी करा—

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर—१.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

:: दक्खिनी हिंदीचा मराठीवर प्रभाव ::

--श्री. देवीसिंह चौहान

मराठी भाषेवर ज्या अन्य भाषांचा कालौघात प्रभाव दिसून येतो त्या भाषात ईराणी म्हणजेच फार्शी भाषेला महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल. ईराणी भाषेचे साहचर्य भारतीय भाषांना चिरकालीन असे प्राप्त झाले. हा काळ निदान सहा सातशे वर्षांचा आहे डॉ. हरदेव बहरी याने फार्सीच्या हिंदीवरील प्रभावाची चर्चा एका इंग्रजी प्रबंधात केलेली आहे. तसेच डॉ. र. न. नायक या गुजराती पंडिताने गुजराती भाषेवरील फार्सी प्रभावाची छाननी एका ग्रंथात केलेली आहे. परंतु दुर्दैवाने मराठी भाषेवरील फार्सी प्रभावाची सामग्र्याने छाननी मराठीत झालेली नाही. अशी छाननी स्व. डॉ. अब्दुल हक याने एका उर्दू छोटेखानी प्रबंधात केलेली आहे. परंतु आम्ही एका लेखात दाखविले आहे की अब्दुल हक यांची छाननी स्व. वि. का. राजवाडे यांची बव्हंशी नक्कल असून ती चोरीच्या सदरातच मोडते. शिवाय हक यांची मांडणी व विचारसरणी अशास्त्रीय, पूर्वग्रहदूषित, उथळ व म्हणून मुळीच विश्वासार्ह नाही. या प्रश्नाचा विचार केवळ राजवाडे यांनीच केलेला आहे. परंतु राजवाडे यांनीही या प्रश्नाचा विचार खोलवर केलेला नाही. अनेक विधाने अतिरंजित व अनैतिहासिक आहेत. याचा विचार आम्ही एका प्रबंधात केलेला असून हा विषय महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या दोन अंकात येऊन गेलेला आहे.

राजवाडे व अब्दुल हक यांनी ईराणी भाषेच्या मराठीवरील प्रभावाचीच चर्चा केलेली आहे. ईराणी म्हणजे फार्सी या साधनाव्यतिरिक्त दक्खिनी हिंदीचे व्यक्तित्व राजवाडे यांना अज्ञात होते असेच दिसते. जयराम पंडिताने उल्लेखिलेल्या बारा भाषांपैकी यावनी म्हणजे फार्सी व दाक्षिणात्य यावनी म्हणजे दक्खिनी हिंदी याची ओळख राजवाडे यांनी करून दिलेली नाही. उर्दू भाषी पंडित या दृष्टीने डॉ. हक यांना हे शक्य होते. परंतु डॉ. हक यांना भाषाशास्त्रीय ज्ञान फारच कमी होते. म्हणून त्यांच्या प्रबंधात राजवाडे यांनी घालून दिलेली भाषाशास्त्रीय चाकोरी डॉ. हक यांनी गिरविली आहे असेच आढळून येते. वाढ किरकोळ स्वरूपाची आहे. डॉ हक यांना दीर्घायुष्य लाभले होते. त्यांनी हा प्रबंध प्रथम शके १८४३ मध्ये प्रसिद्ध केला होता. ते पाच-सहा वर्षापूर्वी दिवंगत झाले त्यांची उभी हयात दक्खिनी हिंदीच्या अध्ययनात गेली. त्यांनी पुढील ४० वर्षात या प्रबंधात एका अक्षराचीही वाढ केली नाही. दक्खिनी हिंदीचा प्रभावही मराठीवर पडला असे विधान, राजवाड्यांच्या प्रमाणेच डॉ. हक यांनीही मुळीच केलेले नाही. स्व. माधवराव पटवर्धन यांनी फार्सी कोश लिहिला. पण त्यांनी फार्सी शब्दांच्या संस्कृतातून व्युत्पत्ति देण्याचा प्रश्न मुद्दामच वेगळा ठेवला. कारण त्यांनी हाती घेतलेले काम वेगळ्या स्वरूपाचे होते. परंतु मराठीवरील प्रभावात दक्खिनी हिंदीचा काही भाग होता असे त्यांचे विधान निदान माझ्या पाहाण्यात नाही. त्यांना दक्खिनी हिंदी ठाऊक होती की नाही हे मला कळू शकले नाही. यावरून मला असे सुचवायचे आहे की, मराठीवरील फार्सीच्या प्रभावाचा विचार यांच्याशिवाय कोणी केलेला आढळत नाही आणि त्यातही दक्खिनी हिंदीच्या प्रभावमार्गाची कोणीही दखल घेतलेली दिसत नाही. स्व. राजारामशास्त्री भागवत यांनी मराठी भाषेच्या विद्यापीठीय स्थानासंबंधी चर्चा करताना फार्सी भाषेचा उल्लेख केलेला आहे. पण तो ओझरता आणि वेगळ्या संदर्भात असल्याने प्रस्तुत चर्चा विषयात काही मार्गदर्शन होईल असे वाटत नाही.

निरनिराळ्या शास्त्रातील मराठी वाङ्मयाकडे पाहिल्यास असे दिसून येते की, फार्सी भाषेचा अधिकतम प्रभाव मुस्लिम कालातील सरकारदरबारातून लिहिल्या गेलेल्या कागदपत्रांत दिसून येतो. सरकारी फर्माने, परवाने, महजर, दरबारातील निर्णय, लोकांनी दिलेले अर्ज, सनदा, इनामपत्रे इत्यादी क्षेत्रात हा फार्सीप्रभाव अधिकतम आहे. स्व. राजवाडे यांची हयात या पत्र-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संग्रहात गुजरली. त्यांनी या पत्राचा अभ्यास केला. या कागदपत्रांमधून त्यांना हा प्रभाव दिसून आला व तो त्यांनी मांडलेला आहे. या वाङमयप्रकारात असा प्रभाव पडल्याचे सर्वत्र दिसून येते. साहित्यातील या प्रभावाची छाननी केल्यास हा प्रभाव ऐतिहासिक गद्य, बखरी आदींमध्ये अधिकतर असा दिसून येतो. निरनिराळ्या बखरी, छत्रपति शिवाजी यांचे सभासदलिखित चरित्र, आज्ञापत्र इत्यादीत अनेक फार्सी शब्द वापरलेले दिसून येतात. मराठी भाषेत मुसलमानी कालात जे काव्य लिहिले गेले त्यात काही फार्सी शब्द मिसळून गेलेले आहेत. परंतु अशा शब्दांची संख्या फारच कमी आहे. याला प्रभावाच्या सदरात घालणे योग्य नाही. हा फार्सीचा मराठीशी आलेला सम्पर्क आहे असे म्हणावे लागेल. नलदमयंती स्वयंवर किंवा सामराजाचे रुक्मिणीस्वयंवर या लौकिक काव्यातही काही फार्सी शब्द आलेले आहेत. ते सम्पर्करूपच होत. एकनाथांनी आपल्या अर्जदास्तमध्ये जे तत्कालीन मराठीभाषेचे स्वरूप दाखविले आहे ते केवळ विडम्बनरूप आहे. मराठी माणसाने काय करू नये असा संकेत नाथांनी सांगितलेला आहे. हे त्यांचे कथन जर परमार्थाने घ्यावयाचे तर त्यांच्या भागवत रामायण आदी वृहद्ग्रंथांतून याचे प्रतिबिम्ब दिसावयास पाहिजे होते. परंतु ते तसे मुळीच दिसून येत नाही. या कारणासाठी आम्ही रुक्मिणीस्वयंवर आणि भागवताचा काही भाग पाहिला. स्वयवरांत पाचदहा शब्द आलेले आहे. भागवतातील ८०० ओव्यात फक्त मिरास, मिराशी, मिरासदार हा एकच शब्द आढळून आला. मराठी भाषेतील सर्व धार्मिक साहित्याची ही अवस्था आहे. या क्षेत्रात फार्सीचा समावेश मुळीच होऊ शकलेला नाही. राजवाडे यांनीही ही परिस्थिती स्पष्ट करून मांडलेली आहेच. म्हणून मुसलमानी काळातील मराठी साहित्यावर फार्सीचा प्रभाव पडला हे विधान जपून वापरले पाहिजे. खरे म्हणजे ते अल्पांशानेच सत्य आहे.

दक्खिनी हिंदीचा प्रभाव

फार्सी भाषेच्या मराठीवरील प्रभावाची चर्चा करीत असत ना, भाषाशास्त्राच्या दृष्टीने झालेला सर्व प्रभाव फार्सीचाच प्रत्यक्ष प्रभाव आहे काय हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व विचारणीय आहे. दुर्दैवाने हा प्रश्न मराठी भाषा चर्चेत हा प्रश्न कोणीच उपस्थित केलेला नाही. स्व. राजवाडे व डॉ. अब्दुल हक हे दोघे या संबंधात महत्वाचे होत. राजवाडे यांना दक्खिनी हिंदी, महाराष्ट्र व तिच्या आजूबाजूच्या प्रदेशात वाढली, विकसित झाली याची माहिती होती असे दिसत नाही. जयराम पंडिताने या भाषेचा उल्लेख केलेला आहे. परंतु राजवाडे यांनी तो उल्लेख उलगडून सांगितलेला नाही. स्व. पटवर्धनांनीही अशी फोड केल्याचे आडळत नाही. अब्दुल हक यांनाही हा दुवा उमगलेला नाही. हा प्रश्न नव्यानेच मराठी विद्वानांसमोर येत आहे. दक्खिनी हिंदीच्या परिचयाने ही गोष्ट समोर येते. मराठीतील समई व जास्त, जास्ती हे दोन शब्द पाहा. समई हा मूळ अरबी शमअ हा असा आहे तो दक्खिनीत नित्यप्रयुक्त आहे. दिवा शब्दाबरोबरच तो वावरतो. परंतु दक्खिनीत तो मूळ स्वरूपात प्रयुक्त होतो. त्याचे ध्वन्यन्तर या भाषेत झालेले नाही. अर्थान्तरही नाही. परंतु मराठीने ध्वन्यन्तर केले. तो इकडे समई झाला. एवढेच नव्हे तर त्याच्या अर्थातही बदल झाला. मराठीत तो विशिष्ट प्रकारचा दिवा आहे. ध्वन्यन्तर व अर्थान्तराच्या संस्काराने पुनीत झालेली समई मराठीच्या देवघरात जाऊन बसली. ही संस्कारप्रक्रिया दक्खिनीत घडलेली नाही. आता जास्त हा शब्द पाहा. हा मूळचा फार्सी शब्द ज़ियादह. हा शब्द सं. जवीयस् शब्दाचा वंशज, निदान सहोदर. हा जियादह शब्द मराठीत जास्त असा बनला. तर प्रश्न असा की हे ध्वन्यन्तर मराठीने केले काय ? याचे उत्तर असे की, ही प्रक्रिया दक्खिनी हिंदीत घडून आलेली आहे. हे ध्वन्यन्तर शके १५३१ च्या अगोदर झालेले दक्खिनी हिंदीत दिसून येते. वजहींच्या कुतुबमुश्तरीत हा शब्द अनेक वेळा वापरलेला आहे. म्हणजे तो शंपाऊणशे वर्षे अगोदरपासून रूढ होत आलेला असला पाहिजे. म्हणून तो त्याने साहित्यगत केला.

हमन पाप ते पुन तेरा ज्यास्त है
नहीं शक कुच इसमें कि यो रास्त है। ९०
अंबर धर्त ते हाल तुज ज्यास्त दावु
कि गेंदां सो फेरां हैं चौगान बावु। २३८

फार्सीतून आलेल्या शब्दांचे अशा प्रकारे दोन गट पडतात. जे शब्द प्रत्यक्ष फार्सीतून आले अशांचे तीन उपगट होतात; जे जसेच्या तसेच मराठीत आले जे अर्थान्तराने मराठीत रूढ झाले आणि ज्यात ध्वन्यन्तरही घडून आले. दक्खिनी हिंदीच्या माध्यमाने मराठीत प्रविष्ट झालेल्या शब्दांचेही असेच तीन उपगट करता येतात. जसेच्या तसे आलेल्या शब्दांची संख्या कमी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मरते. विशेषत: अरबी शब्द बहुधा रूपान्तरित स्वरूपात आलेले आहे. कारण अरबीची उच्चारपद्धती अगदी वेगळी आहे. काही वर्ण अरबीत अधिक आहेत. त्यात बदल अपरिहार्यपणे होतो. फार्सीची उच्चारपद्धती व वर्णमाला आर्यपद्धतीची असल्याने, फार्सी शब्द मराठीत येताना कमी अंतर पडते.

प्रस्तुत प्रसंगी फार्सीतून प्रत्यक्षपणे आलेल्या शब्दांचा विचार कर्तव्य नाही. जे फार्सी–अरबी शब्द दक्खिनी हिंदीच्या माध्यमाने मराठीत रूढ झाले तेच येथे चर्च्य आहेत. दक्खिनीची जी छाया मराठीवर पडली ती केवळ शब्दांच्या उसनवारीनेच आहे असे नव्हे. फार्सीच्या धर्तीवर अनेक संयुक्त क्रियापदे मराठीत रूढ झाली आहेत. फार्सी भाषा या क्षेत्रात संपन्न आहे. हा प्रभाव अजमावतांना ही गोष्टही विसरता कामा नये की मराठीपण या संबंधात काही कमी आहे असे नव्हे. दुर्दैवाने मराठीत असा संयुक्त क्रियापदाचा वेगळा व विशेष अभ्यास झालेला नाही. मराठीची संयुक्त क्रियापदाची संपन्नता जुन्या मराठीच्या कोणत्याही एखाद्या ग्रंथावरून दिसून येण्यासारखी आहे. उदाहरणार्थ केशिराजकृत मूर्तिप्रकाशाच्या ११५ ओव्यात (२९३० ते ३०४५) १०० क्रियापदे वापरलेली आढळतात. हे सर्व फार्सी सम्पर्कपूर्व आहे. हा मुद्दा येथे यासाठी स्मरणात आणून द्यावयाचा की केवळ फार्सी जाणणाराच या प्रभावाचा अन्त घेऊ शकणार नाही. मराठीचे एक संयुक्त क्रियापद अगोदर मराठीत होते. परंतु उत्तरकाळात फार्सी सम्पर्क आला. संयुक्त क्रियापदाच्या दोन अंगांपैकी एका अंगात एका फार्सी शब्दाने प्रवेश केला तर अशावेळी सर्व संयुक्त क्रियापद फार्सीतून आले असे म्हणणे भाषाशास्त्राला सोडून व अनैतिहासिक होईल राजवाडे व अब्दुल हक या विद्वद्वयांनी मराठीतील संयुक्त क्रियापदांची संपन्नता व श्रीमंती मुळीच ध्यानी घेतलेली नाही. म्हणून त्यांचे हे कथन सामग्र्याने सत्य म्हणून स्वीकारता येत नाही. केवळ फार्सीतून आलेली, शरीर व आत्मा दोन्ही फार्सी असलेली क्रियापदेच उसणवारीच्या सदरात जमा होऊ शकतील. नाही तर केवळ एका शब्दाची उसनवारी शेष राहील.

वरील दण्डकच दक्खिनीतून आलेल्या संयुक्त क्रियापदांना लागू आहे. शब्द व संयुक्त क्रियापदे यांच्याबरोबर काही वाक्प्रचार व म्हणीही दक्खिनी हिंदीतून मराठीत आलेल्या आहेत. या संबंधात उसनवारीचे वर्गीकरण सोपे आहे. फार्सी व दक्खिनीचा काही व्याकरणात्मक प्रभाव मराठीवर झाला असे सांगण्यात येते. त्याचा विचार पुढे करू.

शब्दांची आवक

प्रथमत: दक्खिनी हिंदीच्या माध्यमाने जे अरबी–फार्सी शब्द मराठीत आले त्यांचा विचार करू. यापैकी अनेक शब्द मराठीत मायदेशी वावरावे त्याप्रमाणे वावरत आहेत. फजीती (अरबी–फ़ज़ीहत) मुलूक (अ. मुल्क), नजीक (फार्सी–नज्दीक), हौस (अ –हवस) हिकातां, हिकात्या (अ. हिकायत. दक्खिनी अने.), मजकूर (अ०–मज्कूर, वर्णित, उल्लेखित), कारंजा (फा०–कारेज), खातरजमा (अ०–खातिर–जमअ), बदलामी (फा०–बदनामी), हिसेब, हिशेब (अ०–हिसाब, गणित) खोती (तुर्कीखोत, गुत्तेदार), फवारा (फा०–फव्वारह), सुभा (फा०–शुबह, शंका) मुजरा (फा०–मुजरा), विगर (अ०–बग़ैर), खेरीज (अ०–खारिज), शा (फा०–शाह), सुबा (अ०–सुबह), हुदा (अ०–अहदह), पर्त्तपोषी (फा०–पर्दहपोषी), कुलुफ (फा०–कुफ़्ल), मत्ता (अ०–मतअ) जमात (अ०–जमाअत, गट जाति), सरद (फा०–सरहद), ज्यास्त, ज्यास्ती (फा०–जियादह), जनावर (फा०–जानवर) तगादा (अ०–तक़ाजा), गुमट, मराठी घुमट (फा०–गुम्बद), मना (अ०–मनअ), बेफाम (फा० अ०–बे-फ़हम), राजरोशन, मराठी राजरोस (फा०–राजरोशन), जोरावर (फा०–जोर आवर), तसदी (अ०–तस्दीअ), बदल (अ०–बद्ल = मूल्य), मजूरी (फा०–मज्दूर, मज्दूरी), खातर (अ०–ख़ातिर), तनाखोरी फा०–तनहा-खोरी), कवि अनंतफंदीतील फन्दी (फा०–फ़न्द), कारबार (फा०–कार व बार) जिनस, मराठी जिन्नस (अ०–जिन्स, प्रकार, लिंग), मुशारा (अ०–मुशाहिरह) मुलमा, मुलामा (अ०–मुलमअ), वजा (अ०–वज़अ) फायद, (फा०–फाइदह), सरू (फा०–सर्व, झाड), अक्कल मराठी अक्कल (अ०–अक़्ल), सामा, सामां (फा०–सामान), अद्दल (अ०–अद्‌ल, न्याय), आमदानी (फा०–आमदनी). इतराजी (अ०–इअतराजी), इभ्रत (अ०–इब्रत), इमला (अ०–इम्ला), इरसाल (अ०- इर्साल), खालील शब्दात मराठी अर्थाचा बदल झालेला (Semantic Change) झालेला आहे. कजाज (अ०–कज़ाक़), खलबत (अ०–खिल्वत), जालीम (अ०–जालिम) जिनगी, जिनगानी (फा०–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज़िंदगी, जिंदगानी), पोक्त (फा०-पुख्तह), मरूखी (अ०-मरूफी), मातबर (अ०-मुअतबर). मुबलक (अ०-मुब्लिग), मुभा (अ०-मुबाह), शर्यत (अ०-शर्त) समई (क०-शमअ), हलाखी (अ०-हलाक) इत्यादी. हे अर्थान्तर मराठीनेच घडवून आणलेले आहे ते दक्खिनीत झालेले नाही.

शब्दांची ही टिपणी सम्पूर्ण नव्हे. ती केवळ दर्शक आहे. काही शब्दांचा उल्लेख करणे उपयुक्त होईल. साहेब हा शब्द मराठीत अलीकडे विशेष अर्थाने वापरण्यात येत आहे विशेष अधिकारारूढ व्यक्तीं-साठी तो वापरण्यात येत आहे. सातारा-सांगलीची राजकीय मंडळी भारताचे गृहमंत्री श्री यशवंतरावजी चव्हाण यांना साहेब म्हणतात. अन्य सामान्य अधि-कारी व्यक्तींना हा शब्द वापरण्यात येत नाही. येथे सांगायचे हे की हा साहेब (अ०-साहिब) शब्दाचा विशिष्ट अर्थाने वापर शिवकालीन मुसलमान राज-पुरुषात रूढ होता. ही माहिती तत्कालीन दक्खिनी हिंदी साहित्यात मिळते. उदाहरण पाहा येथे शिवाजी महाराज वर्ण्यविषय आहेत.

सदा साहिबां सूं नमक-वर-हराम
किया नित नमक खा जियां-कार काम।
(अलीनामा १०३७)

याच काव्यात हिन्दी शब्द धनी याचाही उपयोग दिसून येतो. हे सुद्धा शिवाजींसंबंधीचे विधान आहे.

धनीं के अपस तोड वादे की बात
बद-अन्देश दिल में हुवा शह-संगात।
(अलीनामा २२६६)

सीदी जौहर सलाबत खान याने द्वितीय अली आदिलशाह याचे विरुद्ध बंड केले म्हणून खालील रोष व साहिब शब्दाचा वापर पाहा.

नफर हो अंदेश्या जो साहिब पो घात
मिल्या धूल में पा सजा हाते हात।
(अलीनामा १४०२)

हौस शब्दाचा मराठीतील अर्थ सर्वपरिचित आहे. हा अरबी हवस शब्द मराठीत ध्वन्यन्तरित व अर्थान्तरित झालेला आहे (Phonetic and Semantic Change). प्रक्रिया दक्खिनी हिंदीतच घडून आलेली आहे. मराठीने दक्खिनीकडून केवळ उसनवारी केली. हौस शब्दाचा दक्खिनीतील वापर पाहा. हाशमी म्हणतो—

मंग्या तो हाशमी हौसों खुशी सूं काड दी घन ने
अपस के तन के गुल्शन क्यां कल्यां जोबन के हरमीं तं।
(गजल २४४७)

अरबीतील बदल शब्दावर ध्वन्यन्तर व अर्था-न्तरांची प्रक्रिया ही दक्खिनीतच घडून आली आहे. बदल, बद्दल हा शब्द मराठीतील प्रत्यय. हा अर्थ दक्खिनीतच प्राप्त झालेला होता.

इता मैं जो सोस्या सो उस धन बदल
न इस शह-परी तें न उस धन बदल।
(कुतुब-मुश्तरी. बेन १३०६)

शिवकालीन मराठीत अरबी सदर शब्दाचा अर्थ दिवाणखाना, दरबार, आस्थानी असा होतो सभासदात तो शब्द याच अर्थाने आहे. दक्खिनी हिंदीतही तो याच अर्थाने वापरलेला वारंवार आढळून येतो.

मध्यकालातदेखील अन्य आर्यभारतीय भाषांच्या मानाने मराठी अधिक प्रगल्भ, विकसित व पोक्त होती असे दिसून येते. मराठीच्या पोक्तपणाच्या काही खुणा दक्खिनी हिंदीनेही उचलल्या होत्या. नामधातू बनवण्याची चाल मराठीत जुनी आहे. अरबी फार्सी नामांपासून नामधातू टंकित करण्याचे काम दक्खिनीने केले आहे. अशा नामधातूची उदाहरणे पुष्कळच मिळ-तात. काही असी खरचना (अरबी-खर्च = व्यय) रंजानना (अ०-रंज, दुःख), कबूलना (अ०-कबूल), अंदेशना (फा. अंदेशह) इत्यादी. काही फार्सी शब्दाला आर्यभारतीय प्रत्यय लागून शब्द घडविण्याचे कसब दक्खिनी हिंदीने दाखविलेले आहेत. गुस्सह हा मूळ अरबी शब्द. परंतु त्याला आलु हा स्वार्थी प्रत्यय लावून दक्खिनीने गुसालू म्हणजे रागीट हा शब्द टंकारला. फार्सीत शोख म्हणजे नखरेबाज. शोख शब्दापासून शोखडी म्हणजे नखरेल असा शब्द बन-लेला आहे. फार्सी अरबी शब्दांना हाती धरूनही तिने कामे करवून घेतलेली आहेत. उदाहरणार्थ चाडीखोर, बाहेरख्याली (बाहिर-खियाल). इलाज उपाय, काट-कसर. कोटकिल्ले खतपतर, खबरबातमी, खेळतमाशा चीजवस्त, तोंडज़बानी, पागपता, दानागल्ला, धन-दौलत, दौलतसंपत्ती, धंदारोजगार, न्यावइन्साफ,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुलूकपरगणा, पांढरासफेत, पिवळा जर्द, फौजशिबंदी, बळजोरी, बाजारहाट, भेटमुलाखत, मरदमाणूस, मगनमस्त, मामूलवहिवाट, मोलमजूरी, रीतरिवाज, वरगवसीला, येळवखत, विचारमसलत (मंसलिहत) सरदारमानकरी इत्यादी.

संयुक्त क्रियापदाबद्दलची सूचना अगोदर आलेली आहे. दक्खिनी हिंदीत खालील संयुक्त क्रियापदे प्रचलित आहेत. अर्थात् फार्सीतून अन्तरित होऊन आलेली यांचा वापर शिवकालीन मराठीतही दिसून येतो. या संयुक्त क्रियापदांवरील प्राथमिक दक्खिनीत झाला व नंतर ते मराठीत प्रयोगबाहुल्याने मराठीतही आले हा क्रमच ऐतिहासिक दृष्टीने सुसंगत आहे. काही संयुक्त क्रियापदे अशी होत — शपथ खाणे, हाक मारणे, आठवण राखणे, खाली करणे, रस्ता देणे, माफ करणे, हुल्ला करणे, रद्द करणे, जमा होणे, बाजू घेणे, दोस्ती ठेवणे, तोम्मत लावणे (तुहमत) मना करणे, जेर करणे, मैदानात आणणे, कमर बांधणे, जाहीर करणे, तालीम देणे दगा देणे, दरखास्त करणे, दाद घेणे, दुवा देणे, नक्कल करणे, नमूद करणे, नकाशा काढणे, पता लावणे, पायमल्ली करणे, फरक पडणे, फारखत होणे, अब्रू राखणे, अंदाजा करणे, अमानत ठेवणे कर्ज घेणे, कसर काढणे, काबीज करणे, सर करणे, खरीदी करणे, जमीनदोस्त करणे, जादू करणे, जोर करणे-फितूर करणे, मुलामा देणे, लाचार होणे, शाबूत असणे, शिफारस करणे, हक्क लावणे इत्यादी इत्यादी.

भारतीय शब्दांपासून बनवलेले काही शब्द दक्खिनी हिंदीने घडविले. ते आज मराठीतही दिसून येतात. त्यांची घडण आरंभी मराठीत झाली असे सांगणे कठीण आहे. म्हणून हे आर्यभारती शब्दरूपे दक्खिनीतून मराठीत आली असे म्हणता येते. उदाहरणार्थ कचरना-कचरणे. सखवाना (सं. शरण), पनपना, हिनाना, म०-हिणविणे (सं. हीन), कानी (सं. कथनिका हिंदी-कहाणी) इत्यादी. गौडबंगाल हा शब्द जुन्या मराठीत नाही. गौड हे बंगालच्या एका नैर्ऋत्य भागाचे नाव. गौड नावाचे नगरही प्राचीनकाली होते. मुस्लिम सत्तापूर्व काळात बंगाल व महाराष्ट्राचा विशेष जवळचा संबंध आला नाही. परंतु मुसलमानी काळात, विशेषतः मोगलसाम्राज्यकाळी हा संबंध अधिक आला. बंगाल्यात वावरलेले अधिकारी येथे येत. येथील तेथे जात. शाहिस्ताखान महाराष्ट्रात येण्यापूर्वी डाक्का येथे होता. बोटे तुटल्यावरही पुनः तेथेच परतला. बंगालमध्ये तंत्रविद्या विशेष प्रचलित होती. म्हणून कदाचित बंगालच्या बाहेर गौडबंगाल म्हणजे जादू, फसवाफसवी असा शब्द रूढ झाला. दक्खिनीत हा शब्द नित्याचा आहे. मराठीतही नित्यप्रयुक्त आहे. हा दक्खिनी हिंदीच्या साहचर्याचाच परिणाम होय. बंगालची जादू पाहा. वजही म्हणतो—

जो बंगाले का सिहर जिव घात है
सो उस मुश्तरी नार की बात है
(कुतुब-मुश्तरी, बैत ६९१)

तालीकोटच्या लढाईतील विजयनगर साम्राज्याच्या पराभवाचे काव्यात वर्णन करणारा हसन शौकी कवी आपल्या एक गजलेत प्रेयसीचे वर्णन करतो—

सुहता अलक मो काला दिसता भुवंग बिसाला
बसता है गौड बंगाला तुज नैन के अंजन में।

बंगाल्यासह भारतावर साम्राज्य चालविणाऱ्या मुसलमानांच्या संपर्कामुळेच गौडबंगाल हा शब्द मराठीत रूढ झाला, हा इतिहासाचा पुरावा होय. खुद बंगालमध्ये असा या शब्दाचा अर्थ आहे की नाही माहीत नाही. पण मराठीत असा अर्थ रूढ व्हावा हे ऐतिहासिक अर्थसन्धारणाशास्त्रानुसार (Historical Semantics) हे मोठे गमतीदार उदाहरण आहे.

मुंडासे हा शब्द मराठीत सरसहा आज वापरात आहे. तो ज्ञानेश्वरीत आढळत नाही. महानुभाव वाङ्मयातही तो आजपर्यंत तरी टिपलेला नाही. तो दक्खिनी हिंदीत सर्वत्र आढळतो. एवढेच नव्हे तर तो नामदेवकाळी दिल्लीच्या परिसरात वापरात होता हे पहिल्या व्याख्यानातील उध्दरणावरून दिसून येते. म्हणजे तो दक्खिनी हिंदीतून मराठींत आला की काय अशी शंका स्पर्शून जाते.

हिंदीचा शिरकाव

भाषाप्रकाश हा रामकविकृत मराठी कोश पुणे विद्यापीठातर्फे डॉ. तुळपुळे यांनी संपादून प्रकाशिला आहे. कोशातील काही शब्दांवरून असे दिसून येते की काही हिंदीभाषेतील शब्द या कोशात समाविष्ट आहेत. ते मूलतः मराठीतील नव्हेत. ते मराठीत आले याबद्दल संपादकांनी शंकाही उपस्थित केलेली नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोशकार दक्षिण महाराष्ट्रातील आहे, त्यामुळे सोमाप्रांतीय हिंदीचा प्रभाव संभवत नाही. दक्खिनी हिंदीचा परिचय असलेल्या अभ्यासूंच्या हे सहजच ध्यानी येते की ही शब्दसंपत्ती मराठी भाषेत दक्खिनीच्या माध्यमाने प्रविष्ट झालेली आहे. चलंती, कुहा (आड) कडका (पद्यप्रकार), गव्हार (अडाणी, मराठी गंवार), गंवावणे (म० गमावणे), सरक (बन्ध, दोर), बहुडणें (पाठविणे, रवाना करणे), गवी (गुहा), पणपणे (तगणें, प्रगती करणे), उपराला (सहाय), गडेरू (हिंदी–गडरिया, गोवळी), मगमगणे (घमघमणे), मंदा (हिंदी शब्द = कळप, सं. मंडल पासून), सुघड (रेखीव) आपेसी (तृ. स्वयें, हिंदी से प्रत्ययापासून), तगबगी (कासावीस) इत्यादी. येथे हेच सांगावयाचे की हे केवळ हिंदी शब्द दक्खिनीच्या माध्यमाने मराठीत आलेले आहेत.

फार्सी उपसर्ग लावून मराठीत रूढ असलेले बरेच शब्द अगोदर दक्खिनीत प्रयुक्त होत होते. मागाहून ते मराठीत आले. उदा. बेताल, बेडौल, बेढब, बेडर, बेचव, बेसमज, बेधडक, बेदरकार इत्यादी तसेच ना उपसर्ग असलेले नकारार्थी शब्द नापत, नापीक, नासमजूत, नासमज. गैर हा नकारार्थी उपसर्ग लागून बनलेले गैरसोय, गैरसमज, गैरचाल, गैररीत गैरमनुष्य हे शब्द. तसेच कमअक्कल, कमकुव्वत, कमवक्त (फा. कमवक्त) इत्यादी.

वाक्प्रचार

काही वाक्प्रचार निश्चितपणे दक्खिनी हिंदीतून मराठी भाषेत समाविष्ट झालेले आहेत. तुफान लेना–घेणे हा मुहावरा मराठीत साहित्यनिविष्ट झालेला आहे किंवा नाही हे तूर्त मला सांगता येत नाही. पण तो माझ्या प्रदेशात–धाराशीव, तुळजापूरच्या परिसरात मराठीजनांत रूढ मात्र नक्की आहे. याचा अर्थ आळ घेणे. हा दक्खिनीत रूढ होता असे हाशमी कवीच्या गजलावरून दिसते. बाहेरख्याली होणे–असणे (लंपट असणे, स्त्रैण होणे) हा वाक्प्रचारही दक्खिनीतून डोकावलेला आहे. ख्याल (फा. खियाल) म्हणजे ध्यान, लक्ष, ज्याचे लक्ष घर सोडून बाहेरचे लागलेले असते असा मनुष्य. अर्थ व्यभिचारीही होतो. याच मूळ कल्पनेवरून ख्याली म्हणजे शृंगारिक, अश्लील असा अर्थ कलगीतुऱ्यांची गाणी म्हणणाऱ्या गावन–शाहिरांमध्ये आजही रूढ आहे. हा केवळ मुसलमान व दक्खिनी हिंदीच्या चिरकालीन सहवासाचा परिपाक होय. अर्थसन्धारणाशास्त्रानुसार साध्या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाल्याचे हे उदाहरण होय. आजूर होणे (फा. आजुर्दह) म्हणजे संशयित, दुःखी होणे. आंजूर घालणे संशयात टाकणे असा ही प्रयोग होतो, दक्खिनीत तो रूढ असल्याचे अलीनाम्यावरून दिसून येते आव घेणे म्हणजे पानउतारा करणे हा प्रयोग अलीनाम्यात आढळतो. माझ्या भागात तो जुन्या मंडळींच्या तोंडी आज देखील आढळतो. आव फार्सीत अप्, आप् (पाणी) शब्दाचे रूपान्तर आहे. पाणउतारा हे मराठीकरण आहे असे वाटते आस्मान तूट पडना (आकाश कोसळणे) हा दक्खिनीत बहुप्रयुक्त प्रयोग आहे. तो फार्सीतून आलेला आहे. फार्सीतील फलक (आस्मान्, आकाश) शब्द अनेक कल्पना–रूपकांचे उगमस्थान आहे. आता आकाश कोसळणे हा प्रयोग मुस्लिम पूर्वकाळातही होता की काय हे पाहाणे मनोरंजक आहे, कदम काडना (पाय काढणे, काढना पाय घेणे) हा वाक्प्रचार दक्खिनीत शिवकालात रूढ आहे. यावरून त्याचे मूळ दक्खिनीत असावे असे वाटते. कमर बसना (कंबर बसणे)–गलितधैर्य होणे हाही दक्खिनीतून आयात झालेला असावा. जीव खरचना हा दक्खिनीतूनच आला अशी शंका येते. जीव बारा होना (जीव बारा होणे)–कोणत्याही कामातून मन उठणे, बेचैन होणे अशा अर्थाचा प्रयोग शिवकालीन दक्खिनीत आहे. तत्पूर्वी तो मराठीत होता की काय हे पाहिले पाहिजे. ताव पकवना (त्वेष धरणे, धमक वाळगणे) फार्सीशी संबंधित नसला तरी हिंदीतून आवक झाला असावा असे दिसते. पावं गाड लडना (पाय रोवून, गाडून लढणे) हा देखील दक्खिनीच्या संपर्काने रूढ झाला असे म्हणावे असे वाटते. किनारा पकडना (फार्सी–किनारःकशी कर्दन) याचा अर्थ केवळ कोपरा धरणे असा नसून अधिक व्याप्तीचे अर्थही त्यातून निष्पन्न होतात. हाती असलेल्या कामाचा त्याग करणे हा त्याचा नित्याचा अर्थ आहे. वाक्प्रचारांची ही संपूर्ण यादी नव्हे. या संबंधात वाट निघावी म्हणूनच याचा उल्लेख येथे आलेला आहे. सर्व वाक्प्रचारांचा मागोवा स्वतंत्रपणेच घ्यावयाला पाहिजे.

दक्खिनीतून म्हणी

मराठी भाषा म्हणींच्या क्षेत्रातही संपन्न आहे. ही तिची संपन्नता पिढीजात (पिढीं + फार्सी जादह) आहे. मुस्लिम संपर्क काळात या संपन्नतेत भर पडली. जुन्या मूल्यवान् वस्तूवर नवीन संस्कार झाले. काही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवीन आलें. काही जुन्यांवर नवीनांचा मुलामा चढला. यातून अगदी नवे कोणते व जुने कोणते हे तपासून काढणे कठीण काम आहे. कारण फार्सी व मराठी या सगोत्र भाषा. दोन्हींची कुळी, संस्कार व भाषिक विकसनशीलता समान वळणाची असल्याने दोन्हींच्या मार्गक्रमणात समान वळणे व समान्तरता असणे शक्य आहे. हे विधान अतिव्याप्त न करताही समानता डोळ्यात भरण्यासारखी आढळून येते. म्हणींच्या बाबतीत अशी समान स्थळे अनेक दिसून येतात. हा प्रश्न खोलाचा आहे. तूर्त एवढेच पाहाणे शक्य आहे की प्रत्यक्ष दिसणाऱ्या काही म्हणी दक्खिनीतून मराठीत आलेल्या आहेत.

जशी नियत तशी बरकत या म्हणीत नियत व बरकत हे शब्द फार्सीतील होत. अशा आशयाच्या निव्वळ मराठी म्हण ही आहेत. पण प्रत्यक्ष ही म्हण मात्र दक्खिनीतील होय, याबद्दल संशय नसावा तिचे शरीर व वळण दक्खिनीतच घटले. मियां-बीबी राजी काय करील काजी, ही म्हण तर मुस्लिम जीवनाची व त्यांच्या विवाहपद्धतीची प्रतीक आहे. मुस्लिमात विवाह हा एक करार आहे, संस्कार नव्हे. दहेज, हुंडा नवऱ्याने देणे व वधूने स्वीकारणे ही लग्नाची मुख्य बाब. या वधूवर मनसा उत्सुक असल्यावर काजी--उपाध्याच्या मध्यस्थाची विशेष आवश्यकता नाही असा सरळ आशय आहे. दक्खिनीत व मुसलमानात नित्यप्रयुक्त आहे. संपर्काने मराठीत आली. त्याचप्रमाणे मियां मूठभर दाढी हातभर ही म्हणदेखील मुसलमानी वर्चस्वाची व त्यांच्याबद्दलच्या मुस्लिमेतर प्रतिक्रियेची द्योतक आहे. चोर तो चोर आणि शिरजोर म्हणीची जडणघडण मुसलमानाकरवी दक्खिनीतच झालेली आहे. घऱ्याला धत्तुरा, चाकराला मलिदा या म्हणीत धत्तुरा हे वनस्पतिविष व मलिदा हे डोले बसविण्याच्या सणाला मुसलमानाकडून केले जाणारे कणकेचे पक्वान्न महत्त्वाचे होत. मलिदा मुस्लिम शिया पंथात महत्त्वाचा असतो. दक्षिणेत नेहमी शिया पंथाचे वर्चस्व राहात आलेले आहे. विजापूरची आदिलशाही व गोवलकोंड्याची कुतुबशाही ही औरंगजेबाकरवी नामशेष झालेली मुसलमानी राज्ये शिया पंथानुयायी होती. म्हणून या म्हणीची निर्मिती दक्षिणेतील होय. ती उत्तरेत आहे की नाही हे माहीत नाही. परंतु ती दक्खिनीत आहे. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ही म्हण दक्खिनीतून मराठीत आली असावी. चुकला फकीर मशिदीत या म्हणीचा संबंध सूफी पंथाशी जुडलेला आहे. हिंदूमधील सन्यास–पद्धतीचा विपर्यास जसा गोसाईजोगडापर्यंत झाला तसा मुसलमान साधुप्रवृत्ति सूफींचा अधःपात फकीरात झाला. असे अधःपतित फकीर मशिदीचा आश्रय घेऊन राहायचे. हे समाजजीवन या म्हणीत प्रतिबिम्बित आहे. एक नूर आदमी दस नूर कपडा ही म्हण मुसलमानांच्या समाजात वावरण्याच्या पद्धतीची आठवण करून देते. मुसलमान समाजात वावरताना, टापटिपीची विशेष दक्षता बाळगत असे यावरून दिसते. यातील नूर, दस, कपडा हे शब्द मुसलमान व दक्खिनीसम्पर्काचे प्रतीक आहेत. काणा कैफती, आंधळा हिकमती या म्हणीतील काणा मनुष्य व आंधळा यांच्या गुणाची ओळख मराठीला चिरपरिचित असली तरी, कैफत (फा कैफियत) व हिकमत (अरबी) या शब्दांच्या अर्थात्मन म्हणीचे शरीर मुस्लिम काळात घडले असे आढळते. कैफियत म्हणजे सुसूत्र माहिती काढणे व हिकमत म्हणजे युक्तीने मार्ग काढणे ही फार्सीशी संबद्ध आहेत. हजीर तो वजीर ही म्हणही दक्खिनीतूनच मराठीत पोचलेली आहे. साठी बुध नाठी अशी एक म्हण मराठी लोकात आज रूढ आहे. या म्हणीचे दक्खिनी हिंदीतील रूप वजही या गद्यलेखकाच्या सबरस ग्रंथात मिळते ते असे-साठी बुद्धी न्हाटी. दोन्ही फरक एवढाच की मराठीतील नाठी शब्दाऐवजी या म्हणीत न्हाटी असे रूप आहे. दक्खिनीत न्हाटना म्हणजे पळून जाणे, सोडून जाणे. साठी झाल्यावर त्याला बुद्धी सोडून पळून जाते असा मथितार्थ. मराठीतील नाठी शब्द या न्हाटी शब्दाचे अपभ्रष्ट रूप होय. साठी ओलांडणाऱ्या माणसाकडे पाहाण्याची समाजाची ही दृष्टी होय.

ऐतिहासिक म्हणी

दक्खिनी हिंदीतील काही म्हणी राजकीय सत्यदर्शनाच्या आहेत. त्या परिवर्तित रूपात मराठीतही रूढ आहेत. अशा म्हणीपैकी तट्टाला फोकारा, तेजीला इशारा. ही एक म्हण मराठीत रूढ आहे. वजहीच्या सबरस ग्रंथात वरील म्हण अशी आहे तट्टूकों टोमणो, तेजी को इशारा.

मराठीत टोणपा असा शब्द असून त्याचा अर्थ काठी, लाठी असा आहे. दुसरा शब्द टोमणा. त्याचा अर्थ टोला, दणका, आघात असा आहे. काठीपासून काठीचा मार आघात असा टोमणा शब्दाचा अर्थ होतो. सहचर्याने ही अर्थसिद्धी होते. वरील हिंदी म्हणीतील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टोमणी म्हणजे छोटी काठी, फोकारा. अर्थात तट्टाला फोकाऱ्याचा मार पाहिजे परंतु तेजीला मात्र इशारा, खुण पुरेशी असते. हा तेजी कोण ? तेजी म्हणजे अरबस्थानी घोडा. मूळ अरबी शब्द ताजी आहे. त्याच-अर्थ अरब देश, अरब लोक. परंतु भारतात अरबस्थानात फार प्राचीन काळापासून घोडे आयात होत. म्हणून भारतात, ताजी म्हणजे अरबस्थानी घोडा असा साहचर्याने अर्थ आला. चिरवासाने या ताजी शब्दाचे मराठीत व हिंदीत तेजी असे सारूप्यीकृत रूप रूढ झाले. ताजी असा शब्द भारतीय साहित्यात दिसत नाही. म्हणून त्याचे तेजी असे पूर्वपरिचित भारतीय भाषात झालेले आहे. तेजी म्हणजे घोडा, अरबी घोडा हा शब्द महानुभाव मराठीत अनेक ठिकाणी प्रयुक्त आहे. अवधि व दक्खिनी हिंदीतही तेजी शब्द प्रयुक्त झालेला आहे. हे सारूप्यीकृत रूप इतके रूढ झाले होते की अमीर खुस्त्रौ (मृत्यु शक १२४७) यांने आपल्या फार्सी भाषेतील महाकाव्यात तेच रूप वापरलेले आहे. हा अरबी ताजी शब्दाचा इमाला म्हणजे अपभ्रष्ट रूप अशी टीप संपादकांना द्यावी लागली. ही या शब्दाची भाषिक बैठक. ज्ञानेश्वरी, शिशुपालवध इत्यादी ग्रंथातील उताऱ्यांची येथे गरज नाही. अरबी घोड्यांची भारतातील आयातीचा परामर्श स्व. डॉ. पी. के. गोडे व मी यांनी घेतलेला आहे. अरबी घोडा हा शरीराने मोठा व गतीला चपळ अशी त्याची ऐतिहासिक कीर्ती चालत आलेली. डॉ. यदुनाथ सरकार यानी मुसलमान कालातील युद्धतंत्राची छाननी केलेली आहे. त्यात विजयनगर साम्राज्याचा तालीकोटच्या युद्धात चार मुसलमान शाह्यांनी पराभव कसा केला याचे दिग्दर्शन आहे. चांगल्या हत्यारांबरोबरच अहमदनगरच्या निजामशाह यान्याजवळ ३००० अरबी घोडे, नुकतेच आयात केलेलें प्राप्त होते असे सांगितलेल आहे. याच घोड्यांच्या सहायाने पराभव करता आला असे एक कारण दाखविलेले आहे थोडक्यात असे कीं अरबी घोडा अन्य घोड्यापेक्षा सरस आहे.

वरील ऐतिहासिक तत्वाचा पाठपुरावा 'तेजीला इशारा' या, वरील म्हणीतल्या, शब्दावरून मिळते. तेजी हा अंगचा चपळ असल्यामुळे त्याला काठी-फोकाने झोटपण्याची गरज मुळीच भासत नाही. त्याला मागचा इशारा पुरेसा होतो. हे सत्य या म्हणीत साठविलेले आहे. महाराष्ट्रातील बैलांच्या जातीपैकी खिलार अर्थात मानदेशी जातीचा बैल फारच चपळ व देखणा असतो. म्हणून श्रीमंत शेतकऱ्यात असे बैल बाळगणे हे आपल्या वैभव व हौसीचे प्रतीक मानण्यात येते. असाच प्रकार तेजी म्हणजे अरबी घोड्याबद्दल होता.

मराठीत 'सिर सलामत, पगडी पचास' अशी म्हण रूढ आहे. आमच्या भागात तरी ती आजदेखील पोक्त माणसांच्या तोंडी आढळते अर्थ सरळ आहे, वाचून जगून राहिलो तर पन्नास मुंडासे मिळतील. या म्हणीचा दक्खिनी हिंदीतील इतिहास मोठा आकर्षक आहे. नुस्रतीने आपल्या अलीनामा महाकाव्यात एका श्लोकार्धात या म्हणीचा वापर केलेला आहे.

मुंडासा गंवाना भला सिर की ठार
कि बांच्या सो यक सिर मुंडासे हजार । २२.३८

मराठी माणसाला आकर्षक गोष्ट ही की ही म्हण कवीने शिवाजीलाच वापरलेली आहे. प्रसंग मुगलसम्राट औरंगजेबाच्या आज्ञेने मिर्जा राजा जयसिंगाने शिवाजीवर केलेल्या स्वारीचा आहे. जयसिंग व दिलेरखान मोठ्या तयारीने आले. पुरंदर किल्ल्यास दिलेरखानाने वेढा घातला. गड पडण्याच्या बेतात आला. शिवाजीवर मोठे संकट कोसळले. संकटातून सुटून निघण्याचा मार्ग दिसेना. सर्वनाश होण्याची चिन्हे दिसू लागली तेव्हा नुस्रतीने केलेले शिवाजीचे वर्णन पाहा

सिवा बलबलाता रह्या हो हलाक
देख्या दो तरफ ते लगी घर कूं आग । २२·३४
खड्ग के तो नैं मूं कूं पाडी रह्या
परेशां हो अफसोस खा यूं कह्या।
बचाने का अब हत ते या वा टल्या
घडी चुप न्हता हूं तो सब घर चल्या ।
कह्या घर ते हत घो वला टालना
न चुप घर बराबर अपस जालना । ३२.३७

यहां, वहां करून वाचण्याची वेळ टळून गेली· घडीभर गप्प बसलो तर सर्व घरच जाते शिवाजीने मनात ठरविले की घरावर पाणी सोडून, ही बला टाळावी. घराबरोबर स्वतःच जळणे योग्य नव्हे. मुंडासे गमावणे असो, डोळे साबूत राहाणे हे बरे. कारण की डोके सुरक्षित राहिले तर पुढे हजार मुंडासे मिळविता येतील याचं मूळ दक्खिनी हिंदीतील म्हणीत फेरबदल करून मराठीने नवीन, आपल्या प्रकृतीला अनुकुल अशी म्हण बनवून घेतली. पण तिचे मूळ पाहाता वरील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाणे आहे-नुसरतीनेही शिवाजी संबंधात वापरण्यापूर्वी कदाचित् अस्तित्वात असेल. तिचे स्वरूप काय होते. कळावयास मार्ग नाही. परंतु ३०२ वर्षांपूर्वी ही म्हण नुसरतीने शिवाजी संबंधातच वापरावी ही मोठी गमतीदार विधिघटना म्हणावी लागेल.

एक म्हण 'कुठं राजा भोज, कुठं गंगा तेली' अशी मराठीत रूढ आहे. राजा भोज याच्या कथा लोकजीवनात ऐकू येतात. ती ऐतिहासिक व्यक्ति आहे हे नक्की. तो मध्यप्रदेशातील धारानगरीचा इस्लामपूर्व काळातील प्रसिद्ध राजा होय. वरील म्हणीत राजा भोजाची तुलना गंगा तेल्याबरोबर करावी हे मोठ विचित्रच आहे हा गंगा तेली नसावा अशी शंका इतिहासज्ञपूर्वसूरींना आली. त्यांनी या गंगा तेल्याचा माग काढण्याचा प्रयत्न केला. स्व. भारताचार्य चि. वि. वैद्य यांनी तो तेली नसून गंग वंशातील तैलप राजा होय असा पत्ता लावला माझ्या शेजारी बसलेले म. म. मिराशीही म्हणत आहेत की, हे बरोबर आहे. या खुलाशानंतर हे सांगायचे की राजा भोज व गंग तैलप हे दोन्ही मराठी लोकजीवनाच्या बाहेरील राजे. मग अशी म्हण मराठीत कशी रूढ झाली ? मला असे सुचवायचे आहे की ती दक्खिनी हिन्दीतून मराठीत आलेली आहे शके १५५८ साली मुल्ला वजही याने लिहिलेल्या आपल्या 'सबरस' या गद्य ग्रंथात वापरलेली आहे. मुसलमान सर्व महाराष्ट्रात तीनशे वर्षापूर्वीपासून नांदत होते. मध्यप्रदेशातील व भारतातील मुसलमानांशी त्यांचे नित्याचे संबंध होते. राजा भोज हा हिन्दी भागातला. गंग तैलपाशी त्याची तुलना करणें हास्यास्पद होय हे सत्य मांडणारी म्हण हिन्दी प्रदेशात रूढ असावी. ती मुसलमानांनी स्वीकारली. गंग तैलप हा शब्द मुसलमानांना उच्चारदुष्कर. म्हणून त्यांनी किंवा लोकांनीच त्याचा गंगा तेली बनवला. मुसलमानांनी ही म्हण आपल्या भाषेत – 'दाक्षिणात्य यावनी' म्हणजे दाक्खिनीत वापरली. चिरसहवासाने ती मराठीने उचलली असा या म्हणीचा मागोवा दिसतो. दक्खिनी हिंदीतील म्हण – **"कहां राजा भोज, कहां गंगा तेली"** (सबरस पृ. २३)

आणखी एक म्हण मराठीत आढळते. **'आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी''** या म्हणीत बंब शब्द वापरलेला आहे हा शब्द मराठीत फारच अलीकडचा व उपऱ्या आहे. जुन्या मराठीत तो आढळत नाही, अलीकडे देखील तो मुस्लिमोतरकाळातला असावा. मराठ्यांचा रामेश्वर व काशीचा विश्वनाथ सोमेश्वर यांचा संबंध धार्मिक यात्राप्रसंगीच येतो. राजकीय दृष्ट्या एकाच वेळी रामेश्वर व सोमेश्वरावर कधीच राज्य केलेले नाही. शिवाय म्हणीचा आशय वेगळाच. दुःख एकीकडे व उपाय दुसरीकडे असा अर्थ म्हणून ही म्हण मराठी जीवनांतून निर्माण होणे कठीण आहे. दक्खिनी हिंदीत ती सापडते. वजही याने तो सबरस ग्रंथातच वेगळ्या शब्दात वापरलेली आहे ती अशी – **'दर्द हिंदुस्तानमे, दवा खुरासान में'** दोन्ही म्हणीतील सत्यदर्शन एकच आहे. उलट दक्खिनी म्हण मूळ अर्थाशी तादातम्य पोंचणारी आहे. या म्हणीत फक्त खुरासान शब्द वापरलेला वेगळा आहे. भारतीय साहित्यात खुरासन शब्दाचा उल्लेख व उच्चार खुरसण, खुरासण असा केलेला आढळतो. खुरासान हा प्रदेश ईराण देशाचा एक प्रांत आहे. तो प्राचीनकाळापासून होता व आजही आहे. तो अफगानिस्तानच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर उभा पसरलेला आहे. या शब्दाचा अर्थ पूर्व, पूर्वेकडील असा आहे संस्कृत स्वर या वैदिक सूर्यवाचक शब्दापासून फार्सी भाषेत खुर, खूर, हूर असे सूर्यासाठी शब्द आहेत. स्थान शब्दावरून फार्सी व ईराणी भाषेत ओस्तान हा शब्द सुभ्यासाठी आजही वापरला जातो. खुरासान हा ईराण देशाचा अत्यंत पूर्वेकडील प्रदेश म्हणून या शब्दाची उत्पत्ति संस्कृत स्वर अधिक आस्थान या शब्दापासून झालेली असावी. या प्रदेशावरील माझा 'महाराष्ट्र साहित्यपत्रिका' क्रमांक १६६, शके १८९० मधील लेख पहावा.) जसा जपान उगवत्यासूर्याचा देश, जसे आसाममधील आपले प्राग्ज्योतिषपुर, तसे ईराणदेशाचे खुरासान. हा प्रदेश शुद्ध ईराणी संस्कृतीचे मूलस्थान होय.

या खुरासानमधूनच मुसलमान भारतात आले. खुरासान प्रदेशाला ईराणच्या मुसलमानी जीवनात तेच अढळ स्थान आहे. जे प्राचीन हिंदुच्या जीवनात भारतातील मध्यदेश, आर्यावर्ताला आहे. म्हणून मुस्लिमकाळात भारतात वावरणाऱ्या मुसलमानांना संकटकाली खुरासान देशाची आठवण होणे सहज आहे. दुःख हिंदुस्थानात उद्भवले, परंतु त्याचा इलाज खुरासानात राहिला अशा अर्थाची म्हण भारतीय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुसलमानांनी घडविली. तिचाच वापर वजही याने केलेला आहे. या म्हणीतून मुसलमान जेत्यांच्या राजकीय जीवनावर चांगलाच प्रकाश पडतो.

भारतीयांना खुरासान हा देश अनोळखी व दूरचा परंतु या म्हणीत सापडलेला अर्थसुवर्णाचा कण टाकून देणेही त्याच्या जीवावर आले. म्हणून चाणाक्ष भारतीयाने खुरासान शब्द वगळून, रामेश्वर व सोमेश्वर या स्थानांच्या सहायाने तो अर्थ जतन करण्याचा प्रयत्न वरील म्हणीत केलेला आहे. ही म्हण हिंदी भाषेतही रूढ असली पाहिजे असे मला वाटते. या म्हणीतून मुसलमानांच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा मागोवा घेता येतो हे निश्चित.

आणखी एक म्हण दक्खिनीत प्रचलित आहे. ती म्हण **'जो कोई आवारा, वह भाई हमारा'** अशी आहे. या म्हणीचा प्रवेश मराठी भाषेत झालेला मला आढळला नाही. ही म्हण वजही याने सबरस ग्रंथातच उपयोगिला आहे. ती मुसलमानी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची व मनोरंजक असल्याने तिचा येथे ऊहापोह करण्याचा थोडेसे विषयान्तर पतकरूनही, विचार आहे. आवारा या सिनेमानें हा शब्द आता चांगलाच रूढ झाला आहे. हा फार्सी शब्द आवाराह असा आहे. हे ध्वन्यन्तर दक्खिनीनेच घडवून आणलेले आहे म्हणीचा अर्थ असा की, जो कोणी भटकलेला, परंतु आमच्याजवळ आलेला, तो आमचा भाऊ. आम्ही त्याला जवळ करू.

मुसलमानाची संख्या भारतात अगदीच विरळ हिंदुजनसागरात मुसलमान भेटायचा म्हणजे दुरळक. म्हणून जेथे मुसलमान थोडया अधिक संख्येने असावयाचे, त्यांना, नवीन आलेला भटक्या मुसलमान माणूस उपयोगीच ठरावयाचा मग तो फकीर असो, सिपाही असो, कारकून असो वा मुत्सद्दी, सेनापति असो. त्याचा उपयोग तत्स्थानीय मुसलमान करून घेत. दिल्लीच्या राज्यसत्तेपेक्षा या गोष्टीची गरज दकनमध्ये फार पडावयाची. येथील राज्यकर्ते मुसलमान विद्वान व लढवय्ये यांचे नेहमी स्वागत करीत हे इतिहासात नमूद आहे. बहामनी राज्याचा मुख्यमंत्री महमूद गावान हा केवळ परकीय आवारा असलेला कर्तबगार ईराणी मुसलमान होता. अशी किती तरी उदाहरणे देता येतील. थोडक्यात असे की आवारा, भटक्या असलेला मुसलमान माणूस देखील दक्खिनी मुसलमानाला भाऊ वाटायचा व ते त्याला जवळ करीत. मुस्लिम समाजाच्या जीवनातील हे वैशिष्ट्य वरील म्हणीत उतरलेले आहे.

सांस्कृतिक

मराठीत प्रचारात असो किंवा नसो, आणखी एका दक्खिनी हिंदी म्हणीचा येथे उल्लेख करण्याचा मोह आवरू नये असे वाटते. हाशमी कवीने एका गजलेत आपल्या पतीवर वियोगाने रुष्ट झालेल्या पत्नीच्या तोंडी दृष्टांत म्हणून या म्हणीचा वापर केलेला आहे. ते कडवे असे—

मास्जिद था मूं पर पेटमें बुतखाना था तो काहोकों
बातां मिठयां करके चले जो दिल में यो कडवास था।
(हाशमी गजल ४. १३)

मस्जिद म्हणजे मशीद आणि बुतखाना म्हणजे देऊळ. पहिली मुसलमानी पण आणि दुसरे हिंदुत्व. उर्दू साहित्यातील प्रतीके. पत्नी म्हणते, 'तुमच्या मनात माझ्यावर खरे प्रेमच नाही. नाही तर वर वर गोड शब्द घोळून तुम्ही मनात अशी कटुता, कडवास बाळगली नसती तुमचे खरे प्रेमच मजवर नाही.' या सर्व प्रकाराला पत्नीने दृष्टान्त दिला की तोंडावर, जिभेवर मस्जिद असली तरी मनात मात्र बुतखाना वसलेलां आहे. हा दृष्टान्त अनेक दृष्टींनी अर्थवाही आहे. भारतातील मुसलमानांमध्ये बाढलेले मुसलमान संख्येने भरपूर. जे नव्याने मुसलमान झालेले, त्यांच्यात इस्लाम धर्माची धार्मिक व सांस्कृतिक परम्परा तावडतोब बद्धमूल व दृढमूल होणे कठीणच. ही परम्परा मुरण्याच्या अनेक पायऱ्या व स्तर आहेत. कच्छी मेमन ही मुसलमान झालेली हिंदूतील एक जात. त्यांचे वैयक्तिक धर्मशास्त्र हिंदूचेच होते. गेल्या २५–३० वर्षात ही परम्परा कायद्याने इंग्रजाने बंद केली ही एक कोटी आहे. सामाजिक चालीरितीत मुसलमानात अनेक हिंदू चालीरीति रूढ आहेत. संस्कार, सणवार इत्यादि अनेक बाबतीत मुसलमानांच्या चालीरीति हिंदूप्रमाणेच दिसून येतात. कानूने-इस्लाम या जाफरकृत इंग्रजी ग्रंथात दक्षिणेतील शिवकालीन मुसलमानांच्या चालीरीतींची नोंद करण्यात आलेली आहे. तसेच फार्सी इतिहासग्रंथातून, हिंदूचे रीतिरिवाज व रूढी राजघराण्यातून कशा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चालत होत्या याची आलेली वर्णनें एका उर्दू त्रैमासि-कातून क्रमवारीने प्रसिद्ध होत आहेत. या ऐतिहासिक पुराव्यावरून व दक्खिनी हिंदीतील अनेक साहित्यिक उल्लेखांवरून या चालीरीतींचा सुगावा लागतो हिंदुमुसलमानात जी वेगळेपणाची भिंत गेल्या ३०-४० वर्षांत उभी राहिलेली दिसते ती १०० वर्षांपूर्वीपर्यंत मुळीच नव्हती असे ऐतिहासिक व इतर पुराव्यांवरून दिसून येते. हाशमीने वापरलेला दृष्टान्त या दृष्टीने अत्यंत उद्बोधक आहे. हाशमीने हा उल्लेख केल्यास तीन पावणे तीनशे वर्षे लोटली आहेत. तत्कालीन मुस्लिम जमातीच्या सांस्कृतिक पातळीचे प्रतिबिम्ब आपणाला वरील म्हणीत पाहावयास मिळते, तांत्रिक धर्माने कोणी मुसलमान झाला असूनही त्याच्या मनोभावनेचे शरीर कसे हिंदू संस्कृतीत जोपासले जात होते, याचा इशारा तीतून मिळतो.

'मस्जिद था मूं पर' हे वाक्य भाषिक दृष्टीने थोडेसे लक्ष्य आहे. आजकाल मस्जिद शब्द स्त्रीलिंगी रूपात उर्दू भाषेत प्रयुक्त होतो. हिंदीतही तो तसाच आहे. परंतु वरील वाक्यात तो पुल्लींगी आहे हे दिसून येईल. सर्व भारतीय आर्यभाषात लिंगाचा घोटाळा आहे हे प्रसिद्धच आहे प्राकृत व अपभ्रंशातही हीच अवस्था राहिलेली नमूद आहे. या सगळ्या अराजकाला कंटाळून प्राकृत वैयाकरणांनी 'लिङ्गम् अतन्त्रम्' असा नियमच सांगून टाकला. मस्जिद शब्दाबद्दलही हीच स्थिति आपणाला येथे दिसून येते. ईराणी म्हणजे फार्सी भाषेत लिंगाला जवळ जवळ गचांडीच मिळालेली आहे. क्रियापद, प्रत्यय, विशेषण यांवर लिंगाचे होणारे परिणाम ईराणीत फार वर्षांपूर्वी लोप पावलेले आहेत. दक्खिनी हिंदी भाषा घडविणाऱ्या मुसलमानांना फार्सीतून आलेल्या निर्लिंग शब्दांची व्यवस्था लावणे आरम्भी अवघड गेले. या गोंधळाच्या खुणा सर्वत्र सापडतात. हीच खूण येथेही दिसते.

भारताची राष्ट्रभाषा असलेल्या हिंदी भाषेच्या पूर्ववर्ती दक्खिनी हिंदीचा मराठीवर निरनिराळ्या दृष्टींनी कसा प्रभाव पडला हे आपण पाहिले. माझी ही प्रतिपादनपद्धति काहीशी नवीन वा चालू पद्धतीला सोडून आहे असे वाटण्याचा संभव आहे. परंतु कोणत्याही देशाचा वा समाजाचा इतिहास पाहात असतांना भाषिक आणि सांस्कृतिक धागेदोरे जुळविले पाहिजेत हे आता सर्वमान्य झालेले आहे. त्याचप्रमाणे एखाद्या भाषेचा अभ्यास करीत असतांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक सूत्रान्वेषण करावयाला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. या सूत्रांखेरीज भाषेचा खरा आशय व्यक्तविता येणार नाही. अशी भाषा हे सुद्धा समाजमानस समजावून घेण्याचे एक साधनमात्र आहे. ही गोष्ट विसरता येत नाही. भाषाशास्त्राची मूलतत्त्वे सन (१९६२) या आपल्या इंग्रजी ग्रंथात विद्वरत्न डॉ. ई. जे. एस् तारापोरवाला यानी दिलेल्या खालील सूचनेचा जेवढा विचार होईल तेवढे चांगले असे मला वाटते.

"The study of the anthropology and ancient history of India must receive full emphasis. Only thus would lingustic work be of any value. Language divorced from the human beings who speak it or spoke it in the past is but a dead thing; but considered as a part of human history it is of the deepest interest. The time has come to emphasise the human aspect of language rather than merely the formal and grammatical aspect as had been done so for." (page 512)

अभ्यासाची दिशा

मराठी भाषेचा, अन्य भाषांच्या मानाने, सखोल अभ्यास अद्यापि व्हावयाचा आहे. हे सर्व विद्वानांना मान्य व्हावे. भाषाशास्त्रीय अभ्यासात एका मर्यादेपर्यंत व्युत्पत्तिशास्त्र महत्वाचे आहेत. परंतु त्याचबरोबर अर्थसन्वारणाशास्त्रही महत्त्वाचे आहे. सामान्य भाषाशास्त्र अथवा भारोपीय भाषाशास्त्र किंवा आर्यभारतीय भाषाशास्त्र यांच्याशीच अर्थसन्वारणाशास्त्राचा (Semantology) सम्बंध संपतो असे नाही. मराठीतील शब्दसंपत्तीचो अर्थ छाननी या शास्त्राच्या आधारे व्हावयास पाहिजे व्युत्पत्ति व अर्थसन्वारणेचा आधार न घेतल्याने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अदेक शद्बांचे अर्थ केवळ योगिक पद्धतीने दिले जातात- त्यामुळे खऱ्या अर्थाची मौक्तिकप्राप्ति होत नाही. दूध न मिळता ताक हाती येते. मोठमोठ्या विद्वानांची अशी दिशाभूल झालेली आहे. एक ऐतिहासिक उदाहरण द्यावयाचे झाल्यास कईसर शद्बाचे देता येईल. कइसर हा शद्ब खरोष्टी लिपीतील प्राकृत शिलालेखात आलेला स्टेन कोना यान चर्चिला आहे. लेखाचा काल शक ४१ म्हणजे इसवी ११९ होय. प्रदेश गांधार म्हणजे भारतातला जुना वायव्य प्रांत. कइसर शद्बाची सांगड रोमन भाषेतील सीझर शद्बाशी कोना व फ्लीट साहेब ह्यानी घातलेली आहे. कारण या विद्वानांनी ईराणी भाषा व कइसर शद्बाची कुळीमुळी पाहिली नाही. पुराणकालात कइकय कयान हे शद्ब ईराणी भाषेत एका राजवंशाचे द्योतक होते. शाइनाम ग्रंथात या राजवंशाची माहिती फिर्दोसीने दिलेली आहे. हा शद्ब ग्रीक भाषेत असून त्याचा उच्चार कईसर असा आहे. या शद्बाची जडणघडण ईराणात होणे शक्य आहे. तो शद्ब कवि अधिक ईश्वर, कवीश्वर शद्बांपासून उत्पन्न असावा. ईराणविद्येचा पडताला घेतल्याशिवाय सीझर शद्बापासून कईसरची कुळी पाहणे गंगा उलटी वाहाण्यासारखे आहे.

हा खोल प्रश्न सोडून दिला तरी अलीकडील हजार आठशे वर्षांचा कालात मराठीच्या विकासात अन्य भाषाभगिनींचे जे सहकार्य लाभले त्याच्याही विचार व्हावयास पाहिजे. या भाषात मुसलमानांच्या संपर्काने हिंदी उर्दूचा या भाषेशी घनिष्ठ संबंध आलेला आहे. दक्खिनी हिंदी ही मराठीच्या अभ्यासात अत्यंत महत्त्वाची बाब आहे असे झालेल्या विवेचनावरू अनुमानता येईल. शिवाय हिंदी म्हणजे सर्वच दक्खिनी हिंदी नव्हे वरवरून पाहणाऱ्यानी महाराष्ट्रात लिहिली गेलेली हिंदी म्हणजे दक्खिनी हिंदी अर्थात खडी बोली असा ग्रह पसरलेला आहे, परंतु हे खरे नव्हे. चक्रधर दामोदर पंडीत, इत्यादि आदिकवींची हिंदी रचना ब्रजभाषेत आढळून येते नादेवावर ब्रज व खडीवोलीचा संस्कार आहे. एकनाथ, तुकारामात बहुधा ब्रजच दिसून येते. पुढील शिवकाला-खडी वोलीचा वापर मराठी कवीनी केलेला आहे. पेशवाईतील महाराष्ट्रीय कवींची रचना केवळ खडीवोली म्हणजे दक्खिनी हिंदीत आहे. डॉ. कृ. ग. दिवाकरांच्या संकलित हिंदी कविता दक्खिनी हिंदीत आहेत. सारांश कालौघानुसार महाराष्ट्रीय कवींनी ब्रजभाषा व खडीवोली यांतून लिखाण केलेले आहे. इतिहासाचे सूत्र हाताशी धरल्याशिवाय हे वारकावे हाती यावयाचे नाहीत. मराठीच्या अभ्यासात या गोष्टींचाही समावेश झाला पाहिजे.

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(एप्रिल १९६९

श्री. मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

तुकाराम बीज

'तुकाराम बीज' निमित्त अभ्यासमंडळातर्फे गुरुवार, दि. ७ मार्च रोजी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी संत तुकारामांच्या वाङ्मयाचे समग्र दर्शन घडविणारे ग्रंथप्रदर्शन आकर्षकरीत्या मांडण्यात आले.

श्री तुकारामांच्या प्रतिमेला संघाध्यक्ष श्री ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पुष्पहार घातला. व प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

यावेळी अभ्यासमंडळातील असंख्य विद्यार्थी व संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

श्रीमंत माधवराव पटवर्धन (सांगली) यांच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ

शनि. दि. ८ मार्च रोजी 'राधास्वामी सत्संग' पंथाच्या ग्रंथसंपत्तीचे आणि सद्‌गुरूंच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

सायं. ७ वाजता न्या. मू. डॉ. भवानीशंकर नियोगी यांचे हस्ते ग्रंथप्रकाशन झाले. हे प्रदर्शन श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयात आयोजित केले होते.

याप्रसंगी डॉ. भवानीशंकर नियोगी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आदी वक्त्यांची भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे पूर्वी श्रीमंत माधवराव पटवर्धन यांनी नागपुरातील चाहत्या मंडळींना अल्पोपहार दिला.

ग्रंथप्रकाशन समारंभ

रवि. दि. ९ मार्च सकाळी ९ वा. धनवटे रंगमंदिरात श्रीमंत पटवर्धन लिखित 'सद्‌गुरूंचे तत्त्वज्ञान' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ झाला.

समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. ग. त्र्यं. माडखोडकर यांनी मंडित केले होते. विधानसभेचे सभापति श्री. बाळासाहेब भारदे यांच्या शुभ हस्ते ग्रंथप्रकाशन झाले.

याप्रसंगी श्रीमंत माधवराव पटवर्धन, श्रीमंत सौ. चंद्रावती राजवाडे व सौ. उषाराजे राजवाडे यांची भाषणे झाली.

भेट व सत्कार

महाराष्ट्र राज्यकला संचालक व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार श्री. माधवराव सातवळेकर यांनी दि. १२ मार्च रोजी संस्थेला भेट दिली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी त्यांचे स्वागत केले.

प्रथम श्री. दुधपचारे यांनी कलाकेन्द्राचे दालन दाखवून आजपर्यंतच्या कार्यक्रमाची माहिती दिली.

संस्थेचे व 'कलाकेन्द्रा'चे कार्य पाहून श्री. सातवळेकर यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी उपस्थित कलाकार आणि सातवळेकर यांच्यामध्ये चित्रकलेच्या विविध पैलूंवर चर्चा झाली.

चहापानानंतर ह्या भेटीचा कार्यक्रम संपला.

कविवर्य श्री. गु. ह देशपांडे यांचा सत्कार

विदर्भाचे सुप्रसिद्ध कवी श्री. गुणवंत हणमंत देशपांडे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त रवि. दि. २० मार्च ६९ रोजी सायं. ६–३० वा. श्री. आ. रा. देशपांडे (कवी अनिल) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी श्री. गु. ह. देशपांडे यांना श्रीफल व शाल देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी प्रा. या. मु. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. श्री. बा. रानडे, श्री. आ. रा. देशपांडे व म. म. द. वा. पोतदार यांची गुणवर्णनपर भाषणे झाली. श्री. गु. ह. देशपांडे यांनी यावेळी 'कोणता मानू चंद्रमा' ही कविता म्हणून दाखविली.

प्रथम सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून सत्कारामागील भूमिका स्पष्ट केली.

शेवटी श्री. त्रि. गो. देशमुख यांनी आभार मानल्यावर कार्यक्रम संपला.

अभ्यासमंडळ

गुरुवार दि. २० मार्च रोजी अभ्यासमंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचे ३ रे पुष्प प्रा. डॉ. द. मि. कुळकर्णी यांनी गुंफले. या व्याख्यानाचा विषय 'नवकथा भावे ते जीए.' हा होता.

यावेळी अभ्यासमंडळाचे संयोजक श्री. चं. शं. कुळकर्णी यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर डॉ. द. मि. कुळकर्णी यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले.

या व्याख्यानाला अभ्यासूवर्ग उपस्थित होता.

एकांकिका वाचन

दि. २३ मार्च ६९ रोजी दुपारी ४–३० वा. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यासमंडळाचे वतीने नवोदित लेखक श्री. शशिकांत केळकर यांनी 'अनोळखी माणूस' या नावाची एकांकिका वाचून दाखविली.

या कार्यक्रमाला बरीच रसिक मंडळी उपस्थित होती.

आजीव सभासद

श्री. प्रतापसिंह काशीरामसिंह गिरासे, टाकळी हे १०१ रुपये देऊन संस्थेचे आजीव सभासद झाले याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

जुन्या सभासदांना नम्र विनंती

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६९ पासून सुरू झाले असून चालू वर्षाची साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ५ आपणाकडून यणे आहे.

वि. सा. संघाचे जे सभासद होतात त्यांना 'युगवाणी' मासिक विनामूल्य पाठविण्यात येते. तरी चालू वर्षाची वार्षिक साधारण सभासद वर्गणी रु. ५ पाठवून आपण सभासद व्हावे, ही विनंती.

सभासद वर्गणो १५ एप्रिल १९६९ पर्यंत आली तरच पुढील अंक पाठविला जाईल.

कळावे, ही विनंती.

नागपूर,
दि. १ एप्रिल १९६९.

मा. नी. गलगलीकर,
सरचिटणीस
वि. सा. संघ.

विशेष सूचना

विदर्भ साहित्य संघाच्या घटनेत दुरुस्ती किंवा सूचना करण्याचे बाबतीत सभासदांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्याचा निर्देश डिसेंबर '६८ च्या 'युगवाणी' अंकात करण्यात आला आहे.

समितीचे कार्य जून अखेरपर्यंत व्हावयाचे असल्यामुळे सूचना करण्यासंबंधीची अंतिम तारीख १ मे '६९ ही ठरविण्यात आली आहे, हे सभासदांनी कृपया लक्षात घ्यावे, ही विनंती,

मा. नी. गलगलीकर,
सरचिटणीस आणि
आमंत्रक, घटना दुरुस्ती समिती.

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर-१
मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटिंग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर-१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ